सोलापूर
# तरुण भारत
www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, २९ एप्रिल २०२४ ⏮ वर्ष दुसरे ⏮ अंक ३९ ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/-




# मतांचा करता येणार पडताळा, सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

## पण उमेदवाराला या अटीची पूर्तता करावी लागणार

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत सर्वोच्च न्यायालयात एतच् (इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन) वरील संशयाचे धुके दूर झाले. न्यायालयाने बॅलेट पेपरच्या आग्रहाला मोडता घातला. पण एक महत्वाचा फैसला दिला. याचिकांमध्ये ईव्हीएम मशीनमधील मतांशी वोटर वेरिफिएबल पेपर ऑडिट ट्रेलचा १०० मतांचा पडताळा होणे गरजेचे असल्याची विनंती करण्यात आली होती. शुक्रवारी सुप्रीम कोर्टाने याविषयीच्या याचिका फेटाळल्या. पण न्यायालयाने एक मोठा फैसला दिला. त्यानुसार उमेदवाराला मतदानादरम्यान गडबड वाटल्यास त्याला मत पडताळ्याची मागणी करता येईल. पण त्यासाठीचा खर्च त्याला करावा लागेल. ईव्हीएमसोबत छेडछाड झाल्याचे समोर आल्यास उमेदवाराची खर्चाची रक्कम परत करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

**SLU ४५ दिवस सुरक्षित ठेवण्याचा आदेश**

न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर एतच-ततझ-ढ शी संबंधित याचिकांवर निकाल सुनावला. खंडपीठाने सिंबल लोडिंग युनिटला ४५ दिवस सुरक्षित ठेवण्याचा आदेश दिला. यावेळी कोर्टाने संतुलित दृष्टिकोन ठेवणे गरजेचे असल्याचे सांगितले. पण एखाद्या प्रणालीवर शंका ही संशयाला जागा देते. त्यामुळे योग्य विरोध करण्यात गैर नसल्याचे कोर्टाने मत नोंदवले. विश्वास आणि सहकार्य संस्कृती यांना प्रोत्साहन देऊन आपण लोकशाहीचा आवाज मजबूत करु शकतो, असे मत न्या. दीपांकर दत्ता यांनी व्यक्त केले.

**उमेदवाराच्या खर्चावर मत पडताळा**

सर्वोच्च न्यायालयाने याचिका निकाली काढताना, तींश तशीळषळलरींळेप संदर्भात ऐतिहासिक निकाल दिला. जर उमेदवार मत पडताळ्याची मागणी करत असेल तर त्याच्या खर्चातून मत पडताळणी झाली पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. एतच् सोबत छेडछाड झाल्याचे सिद्ध झाल्यास उमेदवाराला संपूर्ण खर्च परत करावा लागेल. न्यायालयाने डूालेश्र डेरवळपस णपळीं ची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्याला सील करण्याचे निर्देश दिले. डङ्ण, मतदानानंतर ४५ दिवसांपर्यंत सुरक्षित ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

**EVM चा पडताळा**

निकाल लागल्यानंतर उमेदवारांना तंत्रज्ञांच्या टीमद्वारे EVM च्या मायक्रोकंट्रोलर प्रोगामची तपासणी करण्याचा पर्याय असेल, असे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले. उमेदवाराला शंका आल्यास निकाल जाहीर झाल्याच्या ७ दिवसांत ही प्रक्रिया करता येईल. दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या उमेदवाराला अशी मागणी करता येईल.

## तूरडाळीच्या दरात वाढ

मुंबई : गेल्या काही महिन्यांपासून महागाईमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या घरखर्चाचे बजेट कोलमडले आहे. त्यात आता सर्वसामान्यांना आणखी एक झटका लागणार आहे. अवकाळी पाऊसामुळे तूर डाळीच्या दरात वाढ होणार आहे. त्यामुळे जेवणाच्या ताटातून तूरडाळ गायब होण्याचे संकेत पाहायला मिळत आहे.

तूरडाळीच्या दरात गेल्या आठवडाभरात १० ते २० रुपयांनी वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात तूरडाळीचे दर १८० ते २०० रुपयांवर गेले आहेत. अपुरा पाऊस, काढणीला झालेला अवकाळी पावसामुळे तूरडाळीचे उत्पादन घटले आहे. त्यातच अपुऱ्या पुरवठ्यामुळे गेल्या वर्षभरात तूरडाळीचे दर चढेच आहेत.

त्यामुळे आता गृहिणींचे बजेट कोलमडणार आहे. सध्या बाजर समितीमध्ये तुरीचे दर बारा हजार रुपये प्रतिक्विंटलवर इतके झाले आहेत. फेब्रुवारी - मार्च महिन्यात १० हजार रुपयांवर असलेल्या तुरीच्या दरात एप्रिलमध्ये दोन हजार रुपयांनी वाढ झाली आहे.

# लोकसभा निवडणुकीचा विद्यार्थ्यांना फटका; मुंबई विद्यापीठाने परीक्षा पुढे ढकलल्या

## 'असं' असेल नवे वेळापत्रक

मुंबई : देशभरात निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. महाराष्ट्रात पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील मतदानानंतर आता तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या टप्प्यासाठी जोरदार तयारी सुरु करण्यात आली आहे. याच लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने मोठी घोषणा केली आहे. मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ अंतर्गत उन्हाळी सत्रातील काही परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबई विद्यापीठातर्फे ६, ७ आणि १३ मे रोजी घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या सर्व परीक्षांच्या सुधारीत तारखा विद्यापीठाने एका परिपत्रकाद्वारे जाहीर केल्या आहेत. परिपत्रकानुसार, ६ मे रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा आता १८ मे रोजी होणार असून ७ मे रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा २५ मे रोजी घेण्यात येणार आहेत. तसेच १३ मे रोजी असणाऱ्या परीक्षा थेट ८ जूनला घेण्यात येणार आहेत. परीक्षांच्या तारखांमध्ये बदल झाला असला तरी परीक्षेची वेळ आणि परीक्षा केंद्रांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, अशी माहिती मुंबई



विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिली.

दरम्यान, मुंबई विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर, रत्नागिरी मतदारसंघांपैकी रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये ७ मे रोजी मतदान होणार आहे. तर मावळ लोकसभा मतदारसंघाचं मतदान १३ मे रोजी पार पडत आहे. पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबईमधल्या एकूण ६ मतदारसंघांमध्ये मतदान २० मे रोजी पार पडणार आहे. या मतदानाच्या दिवशी कोणत्याही परीक्षा घेतल्या जाणार नाही. त्यामुळेच परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केलं आहे.

# संस्कृती परंपरेचा वारसा विश्वनेते नरेंद्र मोदी यांनी जपला : राधाकृष्ण विखे पाटील

अहमदनगर : विकासाला प्राधान्य देतानाच, संस्कृती, परंपरेचा वारसा जतन करण्याचे महत्वपूर्ण काम विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. अयोध्येतील ऐतिहासिक श्रीराम मंदिराची निर्मिती करून कोट्यावधी हिंदूच्या अपेक्षा त्यांनी पूर्ण केल्या असल्याचे प्रतिपादन महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

राहुरीचे ग्रामदैवत असलेल्या श्री खंडोबा यात्रेच्या निमित्ताने मंत्री विखे पाटील यांनी दर्शन घेतले. यात्रा उत्सवात सहभागी होवून त्यांनी भाविकांना शुभेच्छा दिल्या. तालुक्यातील विविध गावात त्यांनी मतदारांशी संवाद साधून विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या निर्णयाची माहीती दिली.



देशाला आध्यात्मिक, सांस्कृतिक परंपरेचा मोठा वारसा आहे. विकासाचे उद्दीष्ट साध्य करताना भारताच्या संस्कृती आणि परंपरेचा वारसा जगासमोर आणण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. वर्षानुवर्षे श्रीराम मंदीराचा प्रश्न जाणीवपुर्वक प्रलंबित ठेवला गेला. यासाठी मोठा संघर्ष झाला, अनेकांना बलिदान द्यावे लागले. पण अयोध्येत श्रीराम मंदीर उभारणीचे दिलेले आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे पूर्ण झाले. कोट्यावधी भारतीयांच्या अपेक्षा पूर्ण करून आयोध्येला आता आंतरराष्ट्रीय तिर्थक्षेत्र पर्यटनाचे केंद्र बनविण्याचे स्वप्न पूर्ण झाले असल्याचे विखे पाटील म्हणाले.

उज्जैन येथील महाकालेश्वर मंदीर, काशी विश्वेश्वराचा कारिडॉर आणि समुद्रामध्ये जावून मोदीजींनी मथुरेच्या भूमीची केलेली पूजा, देशाच्या अध्यात्मिक परंपरेची ओळख जगामध्ये पोहचवली असल्याचे विखे पाटील म्हणाले.

मागील दहा वर्षात भारताला विकसनशील राष्ट्र बनविण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या लोककल्याणकारी योजना यशस्वी झाल्या आहेत. योजनांमुळे समाजातील शेवटचा घटक विकासाच्या प्रक्रीयेत आला, सामाजिक सुरक्षे बरोबरच देशाच्या सुरक्षेलाही केंद्र सरकारने महत्व दिले.

अहमदनगर जिल्ह्यातील असलेल्या वारसा स्थळांचाही विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, तिर्थक्षेत्र पर्यटनातून रोजगार निर्माण करणे हेच उदिष्ठ आहे. जिल्ह्यातील युवकांना रोजगार निर्मितीसाठी नगर तालुक्यात औद्योगिक वसाहतीला जागा उपलब्ध करुन देण्यात आली असून, अनेक उद्योग आता जिल्ह्यात येण्यास तयार झाले आहेत. केंद्रात पुन्हा भारतीय जनता पक्षाचे सरकार येणार आहे. राज्यातही महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे निधीची कमतरता विकास कामांना कमी पडणार नाही.

केवळ दहा जागा लढविणा-यांची आश्वासनं या फक्त भुलथापा आहेत. अनेक वर्षे जिल्ह्यात येवून केवळ भांडणं लावण्याचे आणि जिल्ह्याला विकासापासून वंचित ठेवण्याचे काम जाणत्या राजांनी केले. ही लढाई आता अहमदनगर जिल्ह्याच्या स्वाभिमानाची आहे. त्यामुळेच महायुतीच्या उमेदवाराला पाठबळ देवून या जिल्ह्याच्या विकासाचा मार्ग आपण सर्वजण धरुयात असे शेवटी विखे पाटील म्हणाले.

**भाग ०१** सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग झाला ओसाड

# करोडी ते तेलवाडी दरम्यान ५२९४ ऐतिहासिक वृक्षांची कत्तल; वैभवशाली इतिहास पुसला...पुढे काय?



सोलापूर - धुळे महामार्गावर झाडे असताना नयनरम्य छायाचित्र



महामार्गावरील झाडे तोडताना



सोलापूर - धुळे महामार्गावर झाडे नसतानाचे छायाचित्र

तभा वृत्तसेवा/ सहयोग प्र.जावळे

कन्नड :-दि.२९ एप्रिल सोलापूर - धुळे राष्ट्रीय महामार्ग उभारतांना करोडी ते तेलवाडी पर्यंत तब्बल ५२९४ मोठी वृक्ष तोडण्यात आली.

सोलापूर धुळे राष्ट्रीय महार्गाच्या चौपदरीकरणाचे कामास सुरुवात झाली आणि या महामार्गालगत असलेल्या वड,पिंपळ, लिंब,आदी मोठी वृक्ष चौपदरीकरणात अडथळा येत असल्याने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मोठी वृक्ष तोडण्याचा निर्णय घेवून तब्बल ५२९४ मोठ्या वृक्षांना तोडण्यात आले.याभागात पुन्हा वृक्ष लागवड करण्याची त्यात तरतूद होती.मात्र त्यानुसार पुढे वृक्ष लागवड झालेली आढळून आली नाही.

भारताच्या वैभवशाली इतिहासात सातवाहन राजघराण्याची सुवर्ण अक्षरात नोंद आहे.शालिवाहन शके म्हणजेच हिंदू कालगणनेनुसार गुढीपाडव्याचा दिवस हा मराठी नव वर्षाचा पहिला दिवस असतो. शालिवाहनराजाने शकांचा पराभव केला तेव्हापासून ही कालगणना सुरू केली असे म्हणतात.त्या शालिवाहन राज्याची राजधानी आजचे पैठण व त्याकाळी प्रतिष्ठान होते.या प्रतिष्ठान मधून त्या काळी पैठणी कापड,रेशीम,हस्तीदंताच्या वस्तू,मसाले,चंदन सह अनेक वस्तू युरोपात निर्यात होत असे.पैठण हून उत्तर भारत व तेथून युरोप असा मार्ग होता,सदर महामार्ग त्याकाळात कन्नडहून पितळखोरा पुढे खान्देश असा होता.कन्नड हे त्याकाळी कनकावातीनगर म्हणून ओळखले जायचे.या शहरात त्याकाळी हिऱ्यांना पैलू पडण्याचे काम करण्यात येत होते असे म्हणतात.येथील हिरेही याच महामार्गावरून युरोपात निर्यात होत होते. म्हणजे इसवी सन पूर्वी पासून हा महामार्ग अस्थित्वात आहे.अशा प्रकारे या महामार्गाला दैदिप्यमान व वैभवशाली इतिहास आहे.

पुढे इंग्रजांच्या काळात औट्रम नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याने कन्नड - चाळीसगाव जोडणाऱ्या घाटाच्या रस्त्याचा शोध लावला. तेव्हापासून सदर घाट हा उत्तर व दक्षिण भारताला जोडणारा दुवा ठरला.इंग्रजांच्या काळापासूनच या रस्त्यावर हळूहळू रहदारी व रहदारी सोबत व्यापार वाढू लागला.घाटापासून पुढे कन्नड व त्याही पुढे काही भाग इंग्रजांच्या अधिपत्याखाली होता याच काळात इंग्रजांनी या भागात रस्त्याच्या दुतर्फा विविध वृक्ष लागवड केल्याची नोंद आहे.

इतिहास काळापासून अस्थित्वात असलेल्या व महाकाय आकार घेवून रस्त्याला शोभा देणाऱ्या या वृक्षांमुळे या परिसराचे वैभव वाढीस लागले होते.

पुढे तात्कालीन आमदार स्व.रायभान जाधव यांनी पुढाकार घेवून कन्नड ते वेरूळ व त्यापुढे दुतर्फा रिकाम्या जागेत घन वृक्ष लागवड केली. त्यानंतर महाराष्ट्रातील सर्वाधिक धरणे व तळ्यांचा तालुका म्हणून कन्नड तालुक्याची ओळख या दुतर्फा वृक्षांमुळे सार्थ ठरली.या रस्त्यावरून जाताना एखाद्या वैभाशाली,नैसर्गिक संपदेने संपन्न,प्रगत भागाकडे जात असल्याचे प्रवाशांना त्याकाळी वाटत असे.

खान्देशमधून घाट चढून वर आल्यावर थंडगार वाऱ्याची झुळूक अंगावर पडल्या पडल्या या वृक्षांची आठवण येत असे.

संभाजीनगर हून सर्व दिशांना जातांना इतर सर्व मार्गापेक्षा सर्वात निसर्गसंपन्न,नयनरम्य प्रवास हा कन्नडच्या दिशेने होता. संभाजीनगर हून जालना, पैठण, वैजापूर किंवा सिल्लोड कडे जातांना रस्त्याच्या कडेला इतकी वृक्षांची गर्दी बघायला मिळत नव्हती.या वृक्षाच्या खाली वर्षभर विविध व्यावसायिक आपले व्यवसाय करायचे.दौलताबाद व खुलताबाद येथील प्रसिद्ध सीताफळ,अंजीर,हे याच वृक्षांखाली विक्रीतून जगभर प्रसिद्ध झाले.उन्हाळ्यात या वृक्षांखाली उसाच्या रसवंतीची चढाओढ रहायची.हजारो पशू व लाखो पक्षांचे हे निवासस्थान होते.

राष्ट्रीय महामार्गाच्या उभारणीत या ऐतिहासिक वृक्षांना तोडण्यात आले व वृक्षांसोबत या भागाच्या दैदिप्यमान व वैभवशाली इतिहास पुसला गेला. पुढे या रस्त्याच्या मध्ये व दुतर्फा वृक्ष लागवडीचे नियोजन शासनाने व महामार्ग प्राधिकरणाने केले होते मात्र पुढे काय झाले ते बघुया पुढील भागात. ....क्रमशः



# नाचनवेल बसस्थानकावर शौचालय, लघुशंखा व्यवस्था करण्याची ग्रामस्थांची ग्रामपंचायतला मागणी

## प्रत्येक गावाच्या सार्वजनिक, बसस्थानक ठिकाणी शौचालय व लघुशंखा व्यवस्था अत्यावश्यक

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दिनांक २८ एप्रिल- कन्नड तालुक्यातील नाचनवेल बस स्थानक हे व्यावसायिक दृष्ट्या दिवसंदिवस वाढत चाललेले आहे या बस स्थानकावर मोहरा ,डोंगरगाव, आमदाबाद, सारोळा, शाहू टाकळी, नाचनवेल, कोपरेल सह गावातील नागरिक, शालेय विद्यार्थी, प्रवासी, व्यावसायिक यांची मोठ्या प्रमाणात देवाण-घेवाण,खरेदी करण्यासाठी वर्दळ असते गर्दी असते. तसेच छत्रपती संभाजीनगर जाण्यासाठी राज्य क्रमांक ४८ हा कमी अंतराचा मार्ग असल्याने या ठिकाणी वाहने देखील मोठ्या प्रमाणावर थांबतात, त्यामुळे या बस स्थानकावर महिला व पुरुषांसाठी शौचालय व लघुशंखा व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे आहे . गेल्या कित्येक वर्षापासून महिलांसाठी या बस स्थानकावर लघुशंखा व





शौचालय नसल्याकारणाने महिलांना मोठा प्रमाणावर व अत्यंत आवश्यक सुविधांअभावी कठीण समस्या निर्माण होतात. नुकत्याच काही महिन्यापूर्वी झालेल्या ग्रामसभेत समस्त ग्रामस्थांनी याविषयी मागणी केलेली आहे. त्यानंतर बस स्थानक येथील व्यवसायिकांनी देखील निवेदन देऊन तत्काळ व आवश्यक सुविधा लवकरात लवकर करण्यात यावी अशी मागणी केलेली आहे नसता आंदोलन करण्यात येईल असे देखील निवेदनाद्वारे कळविण्यात आलेली आहे. या निवेदनावर बस स्थानकावरील अनेक व्यवसायिकांच्या स्वाक्षरी आहे.

व्यावसायिक प्रतिक्रिया

प्रत्येक गावाच्या सार्वजनिक व बस स्थानकाच्या ठिकाणी शौचालय व लघुशंखा व्यवस्था असणे ही अत्यावश्यक काळाची गरज आहे. नाचनवेल बसस्थानक येथील पूर्वीच्या लघुशंकाची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. ती पण फक्त पुरुषांसाठी सुविधा आहे महिलांच्या विशेष सुविधा नसल्याने महिलांना अतिशय बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. सुविधा अभावी महिलांना लघुशंखासाठी भिंतीचा किंवा घराचा आडोसा घ्यावा लागतो हे दुर्दैव आहे. हा विषय खूप गांभीर्याने घेऊन याचे अंमलबजावणी करणे खूप अत्यावश्यक आहे. मागण्या करूनही ग्रामपंचायत ने यावर अद्यापही कोणताही निर्णय घेतलेला नाही , अंमलबजावणी केलेली नाही असे मत किरण शिंदे, गणेश शिंदे, बाबुराव घरमोडे, श्रीकांत हिरकर रामेश्वर शिंदे, ऋषिकेश जाधव, संजय थोरात, राजू बोर्डे, एम डी पठाण, आधी सह व्यवसायिकांनी मत व्यक्त केले आहे.

ग्रामसेवक मनोहर पवार

सध्या आचारसंहिता लागू झालेली आहे त्यामुळे निवडणूक काळ पूर्ण झाल्यानंतर सरपंच , उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य आम्ही सर्व पदाधिकारी बैठक घेऊन यावर तात्काळ काम करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, याविषयी आमची चर्चा झालेली आहे. हे काम करण्यासाठी सध्य स्थितीमध्ये निधी देखील उपलब्ध नाही, व जागेची देखील अडचण असल्याकारणाने विलंब झालेला आहे .यावर आम्ही योग्य मार्ग काढून लवकरात लवकर ही मूलभूत सुविधा करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

# सहा मोटारसायकली चोरणारा कोतवाली पोलिसांच्या ताब्यात, दोन लाखांचा मुद्देमाल हस्तगत



अहमदनगर : शहरातील स्टेशन रोडवरील महावितरण कार्यालयाजवळून १७ एप्रिल रोजी हिरो कंपनीची एच एक्स मोटरसायकल क्रमांक एम एच १६ डी एफ ६६७९ गेल्याची तक्रार रितेश विजय कांबळे, रा. बोल्हेगाव, अहमदनगर यांनी दिली होती. त्यानुसार कोतवाली पोलीस ठाण्यात २२ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने गुन्हे शोध पथकास मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सदर गुन्ह्यातील चोर हा मोटरसायकल चोरण्याच्या उद्देशाने आयुर्वेद कॉर्नर येथे आलेला असल्याचे समजल्यानंतर तेथे सापळा रचून मिळालेल्या माहितीची खात्री करून संशयीत नितीन दत्तात्रय नवघरे, रा. रेणुकाईवाडी, ता मिरी, ता. पाथर्डी यास ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेऊन चौकशी केली असता दाखल गुन्ह्यातील दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली व यापूर्वी त्याने अहमदनगर शहरातून वेगवेगळ्या ठिकाणाहून एकूण सहा दुचाकी चोरल्याचे कबूल केले. आरोपीकडून एकूण दोन लाख दहा हजार रुपये किमतीच्या सहा दुचाकी हस्तगत करण्यात आल्या.

सदरची कारवाई कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध शाखेच्या स.पो.नि. योगिता कोकाटे, पो.उ.नि. कृष्णकुमार सेदवाड, पो. हेड कॉ. शाहिद शेख, योगेश भिंगारदिवे, ए.पी. इनामदार, संदीप पितळे, पो. ना. अविनाश वाकचौरे, म. पो. ना. संगीता बडे पो. कॉ. अभय कदम, प्रमोद लहारे, दीपक रोहोकले, सत्यजित शिंदे, तानाजी पवार, सुरज कदम, अमोल गाडे, सुजय हिवाळे, शिवाजी मोरे, सचिन लोळगे आदींनी केली.

# सुतारकाम माझ्या आवडीचे -दत्तात्रय पवार वयाच्या ७६ व्या वर्षीही व्यवसाय सुरु



त.भा.वृत्तसेवा/ता.प्र.

कन्नड: दि.२८ एप्रिल - बारा बलुतेदार , अठरा अलुतेदार यामुळे पूर्वीची गावे ही स्वयंपूर्ण होती, हळूहळू जसजसे यांत्रिकीकरण वाढू लागले तसतसे पारंपारिक व्यवसाय लोप पावत चालला असतानाही वयाच्या ७६ व्या वर्षी आपला पारंपारिक सुतार कामाचा व्यवसाय चालू ठेवणारे मुंडवाडी येथील दत्तात्रय पवार यांनी सांगीतले की,सुतारकाम हा माझ्या आवडीचा व्यवसाय आहे.पूर्वी कसा गावगाडा समृध्द असायचा ,सुतार बाबा मध्ये मला पांडुरंग दिसायचा अशा काव्यपंक्ती त्यांची मुलाखत घेणारे शिक्षक प्रविण दाभाडे लिहल्या आहे.

# सापडलेले सात लाख रुपये किंमतीचे दहा तोळे सोने केले परत...

## प्रामाणिकपणाबद्दल महिला उद्योजिका कल्पना पोतदार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२८: साडया खरेदीसाठी आलेल्या गंगापूर येथील महिलेच्या पर्स मधील सात लाख रुपये किंमतीचे दहा तोळे सोने अनावधानाने विसरून राहिले ते सापडलेले सोने पुन्हा गंगापूर येथील किरण खेडकर या महिलेच्या हवाली केल्याबद्दल नेवासा येथील महिला उद्योजिका सौ.कल्पना पोतदार दाम्पत्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

याबाबत माहिती अशी की गंगापूर येथील सौ.किरणताई खेडकर हया नेवासा येथील प्रमोद ज्वेलर्समध्ये असलेल्या कला साडी सेंटर येथे साडया खरेदीसाठी आल्या होत्या. साडया खरेदी झाल्यानंतर सौ.खेडकर हया निघून गेल्या.

साडी दुकानातील साफसफाई करत असतांना सोन्याच्या दागिन्यांनी भरलेली पर्स कला साडी सेंटरच्या प्रमुख सौ. कल्पनाताई पोतदार यांच्या निर्दशनास आले त्यांनी पर्स पाहिली असता त्यामध्ये दोन गंठन,पाच कानातले जोड,ठुशी,नथ,अंगठया असे एकूण बाजारभावाच्या किंमतीप्रमाणे सुमारे सात लाखाचे सोन्याचे दागिने असल्याचे निर्दशनास आले.

सौ.कल्पना पोतदार यांनी आपले पती प्रमोद पोतदार यांना ही बाब निदर्शनास आणून दिली त्यानुसार पर्समध्ये मिळालेल्या मोबाईल नंबर नुसार त्यांनी गंगापूर येथे सौ.किरण खेडकर यांना आपली सोन्याच्या दागिन्यांची पर्स सुरक्षित असून ती घेऊन जावे अशी सूचना केली. त्यानंतर सौ.खेडकर हया नेवासा येथे आल्या व सर्व सोने व्यवस्थित असल्याबद्दल त्यांनी पोतदार दाम्पत्याना धन्यवाद देत आभार मानले.

आजच्या जमान्यात इमानदारी व प्रामाणिकपणा अजून ही जिवंत आहे अशी भावना व्यक्त करत सौ. किरण खेडकर यांनी सौ.कल्पना पोतदार व प्रमोद पोतदार यांचे आभार मानून त्यांचा सत्कार केला. पोतदार दाम्पत्याने दाखवलेल्या प्रामाणिक पणाचे विविध स्तरावर कौतुक होत आहे.सौ.कल्पना पोतदार यांचे नेवासा येथील पेठेत कला साडी सेंटर नावाचे दुकान आपल्या पतीच्या प्रमोद ज्वेलर्स या दुकानातच त्यांनी हे दुकान थाटले आहे.महिला उद्योजिका म्हणून सौ.कल्पना पोतदार यांचा नावलौकिक आहे.त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन तर्फे आयोजित आरोग्य तपासणी शिबिराचा २१२ नागरिकांनी घेतला लाभ



छत्रपती संभाजीनगर : २८एप्रिल रविवार रोजी संत निरंकारी सत्संग भवन सिडको एन ९ शाखा सिडको या ठिकाणी सदगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या असीम कृपेने संत निरंकारी मिशनची समाजकल्याण शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने सकाळी ९ ते ५ या वेळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचे उद्घाटन हुबळी येथील प्रसिद्ध डॉ पुरुषोत्तम अरोरा (कार्डियोलॉजिस्ट) यांनी केले या वेळी मंडळाचे कन्हैय्यालाल डेबरा, जिल्हासंयोजक डी जी दळवी, मुखी सचिन अधाने यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी डॉ पुरुषोत्तमजी म्हणाले कि आजच्या धकाधकीच्या जीवनात कळत नकळत अनेक आजार मानवी शरीरात उदभवतात परंतु त्याची माहिती अनेकांना नसते व स्वतःचे आरोग्य जपण्यासाठी तसेच आजारांचे अचूक निदान होऊन त्यावर उपचार करण्यासाठी अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे करण्यात येत असते. यावेळी १० प्रशिक्षित डॉक्टर्सची टीम देखील उपस्थित होती. रक्तदाब,मधुमेह, थायरॉईड, हृदयरोग, नेत्ररोग,दंतरोग,हाडांचे आजार,सांधेवात,जुनाट आजार इत्यादी आजार असलेल्या रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

# माध्यम कक्ष व आचारसंहिता कक्षास निवडणुक निरीक्षकांनी दिली भेट

## दोनही कक्षाच्या कामकाजाची केली पहाणी

अहमदनगर : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या माध्यम कक्षास व आचारसंहिता कक्षास निवडणूक निरीक्षक (जनरल) रवी कुमार अरोरा व निवडणूक निरीक्षक (पोलीस) पी. अरवींदन यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, अपर जिल्हाधिकारी तथा आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी सुहास मापारी, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी डॉ. रवींद्र ठाकुर, कार्यकारी अभियंता अंकुश पालवे, माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीचे सदस्य महेश देशपांडे आदी उपस्थित होते.

यावेळी निरीक्षकांनी सर्वप्रथम माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या कामकाजाची पहाणी



करत माध्यम कक्षात बसविण्यात आलेल्या दूरचित्रवाणी संचावरून विविध वाहिन्यां, स्थानिक केबल वाहिन्यांवरून प्रसारित होणाऱ्या जाहिराती, बातम्या निरीक्षणाच्या कामाची पाहणी केली. कक्षात दररोज येणा-या विविध वृत्तपत्रांतील बातम्यांच्या कात्रणाच्या संचाचीही निरिक्षकांनी यावेळी पाहणी केली.

आचारसंहिता कक्षाच्या कामकाजाची पहाणी करत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या एसएसटी,व्हीएसटी, एसएसटी पथकांच्या कामांची माहिती जाणुन घेतली. या कालावधीत जप्त करण्यात आलेल्या रक्कमेची माहिती घेत याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी सुहास मापारी यांनी आचारसंहिता कक्षाच्या कामकाजाबाबत तर जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी डॉ. रवींद्र ठाकुर यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाबाबत निवडणूक निरीक्षकांना माहिती दिली.

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया मुक्त, निर्भय वातावरणात पार पाडावी-रविकुमार अरोरा

अहमदनगर : लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने निवडणूकीच्या अनुषंगाने खुप चांगली पूर्वतयारी केली आहे. आपण निवडणूकीच्या महत्वाच्या टप्प्यावर असुन ही निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या अत्यंत संवेदनशील पणे पार पाडाव्यात. निवडणुक प्रक्रियेत सर्वसमावेशक दृष्टीकोन ठेवत काम करण्याचे निर्देश ३७-अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) रविकुमार अरोरा यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित लोकसभा निवडणूकीच्या पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत श्री अरोरा बोलत होते.

यावेळी ३७- अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (खर्च) शक्ती सिंग, ३८-शिर्डी लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) अजय कुमार बिष्ट, निवडणूक निरीक्षक (खर्च) ममता सिंग, निवडणूक निरीक्षक (पोलीस) एम. व्ही.जया गौरी, जिल्हाधिकारी तथा ३७-अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धाराम सालीमठ, अपर जिल्हाधिकारी तथा ३८-शिर्डी लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राहुल पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी श्री. अरोरा म्हणाले की, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने करावयाची सर्व प्रक्रीयेची पुर्वतयारी खुप चांगल्या प्रकारे केली आहे. परंतू केलेल्या पुर्वतयारीची प्रत्यक्षात योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आपण निवडणूकीच्या महत्वाच्या टप्प्यावर आहोत, त्यामुळे सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना चांगले प्रशिक्षित करावे. भारत निवडणूक आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा असणे बंधनकारक आहे. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून मतदानाच्या तारखेपर्यंत ती अधिक वाढणार आहे. त्यामुळे मतदारांना उन्हापासून संरक्षणासाठी शेड व्यवस्था, वैद्यकीय उपचार किट, मदत कक्ष पिण्याचे पाणी यासारख्या सुविधा सहायक निवडणूक अधिकारी यांनी आपल्या मतदार संघात आहेत का ? याची खात्री करुन घ्यावी. प्रामुख्याने ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर आवश्यक सोयी सुविधा आहेत का? ज्या मतदान केंद्रावरुन वेबकास्टींग होणार आहे तेथील इंटरनेट सुविधा सुरळीत राहील याची काळजी

घ्यावी. तसेच दूरस्थसह इतर सर्व मतदान केंद्राची अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे मार्गाची देखील तपासणी करावी. ज्या ठिकाणी त्रुटी आहेत त्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. सी- व्हिजिल या पवर येणाऱ्या तक्रारीचे तातडीने निवारण होईल याची काळजी घेण्यात यावी. निवडणुकीच्या अनुषंगाने देण्यात येणाऱ्या परवानग्या सुविधा पमधून देण्यात याव्यात. निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या अनुषंगाने उपलब्ध करून दिलेल्या सर्व पचा पुरेपूर वापर करण्यात यावा. मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर मॉकपोलच्या वेळी पोलिंग एजंटना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

# एसबीआय लाइफ इन्शुरन्सने३८,२३८ कोटी रुपयांच्या नवीन व्यवसाय प्रीमियमची नोंदणी

पुणे - एसबीआय लाइफ इन्शुरन्सने, देशातील अग्रगण्य जीवन विमा कंपनी ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी ३८,२३८ कोटी रुपयांचा नवीन व्यवसाय प्रीमियम नोंदवला आहे. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षासाठी हाच आकडा २९,५८९ कोटी रु. एवढा होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत एकल प्रीमियम ४४% ने वाढला आहे.संरक्षणावर संपूर्णपणे लक्ष केंद्रित करून, एसबीआय लाइफ संरक्षणचा नवीन व्यवसाय प्रीमियम ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षात ४,१६५ कोटी रु. एवढा झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा यात १५% ची वाढ झाली आहे. संरक्षण वैयक्तिक नवीन व्यवसाय प्रीमियम ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी ९५१ कोटी रु. आहे. वैयक्तिक नवीन व्यवसाय प्रीमियम गेल्या वर्षाच्या तुलनेत १४% ने वाढून २३,८३२ कोटी रु. एवढा झाला आहे.

# रावसाहेब दानवे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२७, येथील ना. अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय शिवसेना भवन येथे जालना लोकसभा मतदारसंघ महायुतीचे उमेदवार खा. रावसाहेब पा. दानवे यांच्या सिल्लोड - सोयगाव विधानसभा मुख्य प्रचार कार्यालयाचे उद्घाटन ना. अब्दुल सत्तार तसेच ना. रावसाहेब पा. दानवे यांच्याहस्ते थाटात संपन्न झाले.

महायुतीचे उमेदवार खा. रावसाहेब पा. दानवे यांना सिल्लोड सोयगाव विधानसभा मतदारसंघातून सर्वाधिक मताधिक्य देण्यासाठी महायुतीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी एकदिलाने, एकजुटीने काम करावे असे आवाहन ना. अब्दुल सत्तार यांनी केले. जालना लोकसभा मतदार संघाचे नेतृत्व पुन्हा एकदा रावसाहेब पा. दानवे यांच्याहाती देण्यासाठी कमळ या निशाणीला मतदान करण्याचे आवाहन ना. अब्दुल सत्तार यांनी मतदारांना केले.

अफवांवर विश्वास ठेवू नका, भूलथापांना बळी न पडता देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कमळ या निशाणी ला मतदान करा असे आवाहन उमेदवार खा रावसाहेब पा. दानवे यांनी केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या सत्ताकाळात शेतकरी , गरीब , बेरोजगारांच्या हिताचे निर्णय घेतले.

काँग्रेस ने ६० वर्षात काहीच केले अशी टीका दानवे यांनी केली. मतदारांनी विकासाचे अवलोकन करावे असे सांगत कमळ या निशाणी ला मतदान करण्याचे अवाहन रावसाहेब पा दानवे यांनी केले.

याप्रसंगी अर्जुन पा. गाढे, सुरेश बनकर, केशवराव पा. तायडे, देविदास पा. लोखंडे, नंदकिशोर सहारे, मकरंद कोर्डे, श्रीरंग पा साळवे,रामदास पा पालोदकर, अशोक गरुड, राजेंद्र ठोंबरे,प्रताप प्रशाद, संजय डमाळे, अनिल खरात यांच्यासह शिवसेना - भाजप सह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नाचनवेल, आडगाव नवतरुण युवापिढीला मेजर राजकुमार शर्मा यांचे मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दिनांक २८ एप्रिल- कन्नड तालुक्यातील नाचनवेल सैनिक भवन येथे व आडगाव भोसले या दोन्ही सैनिकांचे गाव म्हणून ओळख असलेल्या गावांना मेजर राजकुमार शर्मा यांनी दि. २६/०४/२०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील शौर्य अकॅडमी च्या विध्यार्थ्यांना तसेच नवतरुण युवा पिढीला विद्यार्थिनी तसेच सैनिकीपूर्व प्रशिक्षण घेणाऱ्या सर्व युवकांना मोलाचे मार्गदर्शन केले. सैन्य भरतीच्या वेळी येणाऱ्या अडचणी यावर कशी मात करावी व उद्भवणाऱ्या सर्व समस्या कश्या प्रकारे निराकरण करावे याविषयी प्रोत्साहित केले.

या कार्यक्रमाचे आयोजन समाज गौरव पुरस्कार प्राप्त तथा पूर्व भारतीय सैनिक गजानन पिंपळे



व छडऋ कमांडो ज्ञानेश्वर कोलते यांनी केले होते. समाजातील युवा व नवतरुण पिढीसाठी गजानन पिंपळे हे नेहमीच प्रयत्नशील असतात. यावेळी नाचनवेल गावचे कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक शिवाजी थोरात, निसर्ग मित्र देविदास थोरात, कैलास थोरात, किशोर थोरात, मधुकर थोरात, सचिन थोरात, ऋषिकेश थोरात विशाल राजपूत मंगेश थोरात राजू काकफळे, विश्वासराव भोसले, किशोर भोसले, रमेश सुस्ते (माजी सैनिक), अनिल भोसले, दामोदर सुस्ते, सुभाष सुस्ते, शिवाजी भोसले आडगाव चे व इतर ग्रामपंचायत सदस्य व गावकर्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच सैनिक समाधान सुस्ते यांच्या निवासस्थानी भेट दिली. या निम्मित्ताचे औचित्य साधत आजी-माजी सैनिकांच्या यांच्या योगदानातून बनविलेले गावातील सैनिक भवन व जेष्ठ नागरिक कक्ष पाहणी सुद्धा मेजर राजकुमार शर्मा यांनी केली. सैनिकांनी व माजी सैनिकांनी केलेल्या कामगिरी बद्दल मेजर राजकुमार शर्मा यांनी प्रशंसा व कौतुक केले .

# मंगेश साबळे च्या उमेदवारीने दिग्गजांच्या पोटात घालमेल!

## मंगेश साबळे यांच्या उमेदवारीने जालना लोकसभेत तिहेरी लढत रंगतदार होणार?

**तभा वृत्तसेवा**
**जालना / सुरेश कवडे पाटील**

जालना लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकूण ४७ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यात २६ एप्रिल रोजी पार पडलेल्या छाननी प्रक्रियेत १२ उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी प्रसार माध्यमांना दिली होती . मंगेश साबळे





हे फुलंब्री तालुक्यातील गेवराई पायगा येथील रहिवासी असून गरिब घरातले कोणताही राजकीय वारसा नसणारे युवा युवा सरपंच आहेत .अल्प-ावधीतच लोकप्रिय झालेल नाव म्हणजे सरपंच मंगेश साबळे जालना जिल्हयातून मराठ आरक्षणाचा वणवा पेट घेत आसताना मंगेश साबळे यांनी मराठा आरक्षणात सक्रीय सहभाग घेतला होता त्यात त्यांनी स्वतःची चारचाकी गाडी पेटवून देत निषेध व्यक्त केला होता . तर मुंबई येथे गुणवंत सदावर्ते यांच्या गाड्यांची तोडफोड केल्याने राज्यात मंगेश साबळे नाव चांगलेच चर्चेत आले होते . त्याच मंगेश साबळे यांनी जालना लोकसभेच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज भरला होता . मराठा आरक्षण संघर्ष योध्दे मनोज जरांगे यांचा पाठींबा नसतानाही सरपंच मंगेश साबळे यांनी लोकसभेसाठी उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला असल्याने मविआचे कल्याण काळे यांच्यासह महायुतीचे खा . रावसाहेब दानवे दोन्हीही दिग्गज नेत्यांच्या पोटात घालमेल सुरू झाली असल्याची चर्चा जालना लोकसभा मतदारसंघातील खेडोपाड्यात वयोवृद्ध व्यक्तींच्या तोंडुन रंगत आहे . त्याच बरोबर अशीही चर्चा रंगत आहे कि ,आजपर्यंत मराठा समाजाकडे कोनी पाहिल नाही .मनोज जरांगे यांच्या माध्यमातुन आरक्षणाचा लढा उभा राहिला लहान थोर माता माऊली रस्त्यावर उतरले भेटल काय लाटीचार्ज झाला मराठा समाजाच्या आई बहिणीवर गोळ्या झाडल्या डोके फोडले कुठे होतात खा . दाणवे आणि काळे तेव्हां तुम्ही कुठे होता तुम्ही उपोषणाकडे डोकुणही न पाहिल्याने मनातून आरक्षणाला विरोध करता की काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे . संविधानिक पद्धतीने मराठा आर-क्षणावर मनोज जरांगे यांनी सकल मराठा समाजाच्या वतीने अंदोलने ,मोर्चे काढले म्हणून जर लाठ्या काठ्या आणि गुन्हे दाखल करून हे सरकार मराठा समाजाला जाणीवपूर्वक त्रास देत असेल तर लोकशाही मार्गाने देखील मराठा समाज मतपेटीतून आपला संताप व्यक्त केल्याशिवाय राहणार नाही, आणि याचा फटका नक्कीच कुणाला बसणार आहे हे मात्र नक्की सांगता येणार नाही . म्हणून मंगेश साबळे हा जालना लोकसभेत तिसरा पर्याय म्हणून मतदार पाहणार असल्याचे बोलले जात आहे .

---

## संक्षिप्त

### जीवन जगण्यासाठी सारासार विचार अत्यंत महत्त्वाचा ह.भ.प .लोखंडे महाराज



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

मौजे वरूड ( बु )येथे फिरती गव चतुर्थी वारकरी मंडळ मराठवाडा विदर्भ उपक्रमांतर्गत १० ऑक्टोबर २०१८ च्या चतुर्थीचा समारोप भोकरदन तालुक्यातील वरुड वाघ येथे झाला पुढील चतुर्थी पुन्हा प्रथम गाव जिथून चतुर्थी सुरू झाली होती तेथे नारळ देण्यात आले जीवनामध्ये सार काय आहे असार काय आहे याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे आणि विचार करून कंठामध्ये भगवंताचा नाम धारण केलं पाहिजे भगवान प्रमात्म्याचे नाम जर आपण कंठामध्ये धारण केलं तर आपल्या जीवनामध्ये भवसागर तरुण जाण्यासाठी आणि संकट दूर करण्यासाठी भगवान परमात्म्याचे नाव आपल्या जीवनामध्ये चेतना देतात म्हणून मनुष्य कुळा मध्ये तुम्ही आम्ही जन्माला आलो तर वाचेणे रामनामाचा स्मरण करणे अत्यंत महत्त्वाचा आहे असा मोलाचा सल्ला लोखंडे महाराजांनी दिला नामस्मरणाची ताकद एवढी मोठी आहे की कोट्यावधी कुळाचा उद्धार नाम चिंतनाने झाल्याशिवाय राहत नाही संत श्रेष्ठ चोखोबाराय भगवत भक्त अर्जुन जनाबाईच्या गौर्या आणि संतसृष्टी जगद्गुरु तुकोबांच्या पायाखालची माती सुद्धा विठ्ठल विठ्ठल म्हणायची हा नाम चिंतनाचा महत्त्वाचा महिमा आहे आणि म्हणून फीरती चतुर्थी चालू करण्याचा हेतु आहे की आपल्या परिसरामध्ये जनजागृती झाली पाहिजे संतांचे विचाराची देवान-घेवाण झाली पाहिजे आणि प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये निर्वेष्णीपणाने उद्योग करून जीवन आपल्या सुजलाम केलं पाहिजे हाच हेतू या उपक्रमाचा आहे गेले पाच वर्षापासून हा उपक्रम आपल्या पिंपळगाव रेणुकाई परिसरामध्ये चालू आहे असे पाच वर्षापासून या उपक्रमाला सर्वांनी भरभरून सहकार्य केलं विशेषत्वांनी पत्रकार मंडळीचे खूप मोठे योगदान आपले लेखनाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचा प्रचार प्रसार करण्यामध्ये आहे उपस्थित मराठवाडा आणि विदर्भ येथील वारकरी मंडळी बहुतांश संख्येने होते समस्त ग्रामस्थ मंडळी वरूड वाघ यांनी खूप उत्साहाने फिरती चतुर्थी केली त्याबद्दल हभप सास्ते महाराज यांनी गावकऱ्यांचे व फीरती चतुर्थी वारकरी बंधु यांनी आभार मानले .

### आज झेटींग बाबा यात्रेनिमित्त कावजवळ्यात अंखड हरिनाम सप्ताहाचे आयोजन!

**तभा वृत्तसेवा**
**परतुर / प्रतिनिधी**



प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी झोटींग बाबा यात्रा निमित्ताने समस्थ कावजवळा ग्रामस्थांच्या वतीने अखंड हरिणाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण , शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे . शिवमहापुराण कथेचे वाचक ह. भ. प. अनुपानंद महाराज यांच्या सुश्रुज्ञ वाणीतून होणार आहे . तसेच पुढील सात दिवस किर्तन , भजन, प्रवचन , जागर असे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत तरी सर्व पंचक्रो-शीतील सर्व भावीक भक्तांनी ज्ञानेश्वरी पारायण साहळा , शिवपुराण कथा , किर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्य मौजे कावजवळा ग्रामवासियांनी केले आहे .

### देशात लोकशाही टिकविण्यासाठी उद्याला मतदान करा – प्रेमभाऊ शिंगारे

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

२९ मार्च अंबड मतदान आशा उमेदवार पक्षाला करा जो लोकशाहीचा सन्मान करतो जो लोकशाहीला अधिकाधिक बळकटी देण्यासाठी काम करतो ना की त्यांना ज्यांना या देशात अघोषित हुकुमशाही एकाधिरशाही आणायची आहे.

देशासाठी कदाचित ही शेवटची निवडणूक असू नये याची काळजी सर्वांनी घ्या ,मतदानाची- लोकशाहीची प्रक्रिया अविरत चालावी यादिशेने एक पाऊल म्हणजे उद्याचे मतदान आहे एवढं लक्षात ठेवा. ज्यांना लोकशाही ,घटना पायदळी तुडवून या देशात अराजकता ,हुकुमशाही-एकाधिरशाही आणायची आहे त्यांना लोकशाही पद्धतीनेच बाजूला करा आणि लोकशाहीला बळकटी द्या. ज्यांना लोकशाही संपवायची आहे ,ज्यांना घटनेची सर्वसमावेशक तत्व मूलभूत हक्क-अधिकार मान्य नाहीत त्यांचा पराभव झाला पाहिजे याच दिशेने आमचे मतदान व्हायला हवे ,अमुक अमुक पक्षाची ,तुमची आमची ताकद मतदानात दिसावी,आमचाही पक्ष मोठा व्हावा यासाठीची ही निवडूनक बिलकुल नाही ही निवडणूकच मुळात पुढील निवडणुका जिवंत ठेवण्यासाठीची आहे म्हणून या एकाधिरशाही आणू पाहणाऱ्या पक्षाचा पराभूत करणाऱ्या पक्ष व उमेद्वारालाच आमचे मतदान झाले पाहिजे याची अतिमहत्वाची काळजी सुद्धा आम्हाला घ्यायची आहे.

---

# मोदी सरकारने आदिवासी, भटके- विमुक्त, गरिबांना विकासाच्या प्रवाहात आणले – ना.रावसाहेब दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

गरिबीतून आलेले आणि गरिबांच्या विकासाचा विचार करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने शिक्षण, आरोग्य, प्रशिक्षण अशा महत्वकांक्षी योजनांतून आदिवासी, भटके- विमुक्त, बलुतेदार, गोर-गरिबांना विकासाच्या प्रवाहात आणले सर्व जाती- धर्मातील गोर-गरीब जनतेने आपला प्रतिनिधी म्हणून नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करावे असे आवाहन केंद्रीय मंत्री तथा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी रविवारी ( ता. २८) केले.



जालना लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी काल श्रीक्षेत्र राजुर येथून आपल्या प्रच-ाराचा शुभारंभ केल्यानंतर आज जालना विधानसभा मतदारसंघातील पीर पिंपळगाव, घाणेवाडी, श्रीक्षेत्र आनंदगड तसेच जालना शहरात सामूहिक उपनयन संस्कार सोहळा, धन्य निरंकार भवन, बांधकाम व्यावसायिकांच्या भेटी घेऊन संवाद साधला. यावेळी ह. भ. प. डॉ.भगवान महाराज आनंदगडकर,पद्मश्री दादासाहेब इधाते,दुर्गादास व्यास, जालना विधानसभा प्रभारी भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत ,रामेश्वर पाटील भांदरगे,संध्याताई देठे,अतिक खान,भाऊराव देशमुख, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, सिद्धिविनायक मुळे, ओमप्रकाश चितळकर, तालुकाध्यक्ष वसंत शिंदे अर्जुन गेही, गेंदालाल झुंगे, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष भागवत बावणे, कपिल दहेकर,सतीश जाधव,शशीकांत घुगे,धनराज काबलिये, विष्णू डोंगरे, कृष्णा खिल्लारे, कारभारी वाघ, सतीश केरकळ,दुर्गादास व्यास,पवन झुंगे आदींची उपस्थिती होती.

केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी मागील दहा वर्षांत गाव, तालुका, जिल्हा ते देश पातळीपर्यंत रस्ते, पायाभूत सुविधांमुळे झालेला कायापालट, पिक विमा, पेन्शनच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळालेला आधार, गोरगरिबांना मोफत धान्य अशा विकास कामांची महती सांगत ७५ वर्षात काँग्रेसने खेड्यांकडे लक्ष दिले नसल्याची टीका ना.दानवे यांनी केली. आपण केलेल्या विकासाला पाहून मतदान करा असे आवाहनही त्यांनी केले.

भास्करराव पाटील दानवे यावेळी म्हणाले, जालना शहरासह ग्रामीण भागातील रस्ते, शिक्षण, रोजगार असा सर्वांगीण विकासाचा अनुशेष ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी भरून काढला आहे. त्यांना केंद्रात पुन्हा कॅबिनेट मंत्री होण्यासाठी कमळ निशाणी समोर बटन दाबून लाखोंच्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

भागवत बावणे, बबनराव शिरसाठ यांनी मताधिक्क्य देण्याची हमी दिली. सूत्रसंचालन कपिल दहेकर यांनी केले तर शरद बावणे यांनी आभार मानले. यावेळी कृष्णा कोरडे, सुधाकर बावणे, याकुब शेख, बाबासाहेब मंडाळे, महेश देशमुख, राजू बनसोडे ,किशोर सोळुंके ,विठ्ठल बरकासे, सरपंच नंदकिशोर सहारे, शिवाजी जाधव, सिद्धेश्वर बावणे, दादाराव कावले, सुभाष कावले, गणेश बावणे ,सय्यद रशीद ,शंकरराव बावणे, रमेश चौधरी, रमेश बावणे ,कैलास बावणे, यांच्यासह महिला व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उप-स्थिती होती.

छत्रपती शिवाजी महाराजांना टेन्शन आले की ते समर्थ रामदास स्वामींसह संतांकडे जायचे. गाईचे रंग वेगळे असले तरी दूध मात्र एकच असते त्याचप्रमाणे केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे हे धार्मिक प्रवाहातील असून त्यांना कोणतेच टेन्शन राहणार नाही असे आशीर्वचन ह. भ.प.डॉ.भगवान महाराज आनंदगडकर यांनी दिले.भटक्यांना व्यवहारिक स्तरावर संसार, प्रपंच, नीट व्हावा यासाठी सरकारी योजनांची मदत मिळत असल्याचे डॉ. आनंदगडकर यांनी सांगितले. पद्मश्री दादासाहेब इधाते, दुर्गादास व्यास यांनी याप्रसंगी मार्गदर्शन केले तर सूत्रसंचालन डॉ.सोमीनाथ खाडे यांनी केले.

---

# सराफातील ढापा फुटला महिनाभरा पासून दुर्लक्ष! अरुंद रस्त्यात फुटलेल्या ढाप्यात गाडी फसली!

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतूर शहरातील मोंढा भागात भाजी मंडई सराफा कडे जाणाऱ्या रस्त्यातील नाली वरील ढापा गेल्या एक ते दीड महिन्यापासून फुटलेला आहे सदरील ठिकाणी मोठा खड्डा असल्याने अनेक वाहनधारकांच्या गाड्या बसून अपघात झाल्याच्या घटना पहावयास मिळाल्या दोन दिवसापूर्वी या खड्ड्यात एक चार चाकी वाहन सराफा कडे जात असताना चाक खड्ड्यात रुतल्याने फसली होती यावेळी कार मध्ये बसलेले प्रवासी दणकण आढळल्याने



आरडाओरडा करत असताना आजूबाजूच्या लोकांनी धाव घेत महिलांना कार बाहेर काढून अक्षरशः कारला उचलून बाहेर काढले परतूर पालिकेत गेल्या अनेक महिन्यापासून स्वच्छतेच्या बाबतीत अक्षम्य दुर्लक्ष आहे पालिकेतील सफाई कामगारांचे पगार न झाल्याने कामगार मनःपूर्वक काम करीत नसल्याचा निर्वाळा एका सफाई कर्मचाऱ्यांनी दिला न्यू दहिवाळ ज्वेलर्स जवळील नाली वरील ढापा सुटलेला असून याबाबत अनेकदा तक्रारी करूनही याकडे दुर्लक्ष केले गेले अग-ोदरच छोटा रस्ता व त्यात अतिक्रमणाच्या वेळाने अरुंद झालेल्या या रस्त्यावर ढाबा फुटल्याने नागरिकांना ये जा करताना व वाहने चालविताना अक्षरशः कसरत करावी लागते. अनेक वेळा वयोवृद्ध नागरिक व महिला या खड्ड्यात पडून जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. याबाबत पालिकेने त्वरित कार्यवाही करून सदरील ठिकाणी जाम झालेली नाली सफाई करून सदर ठिकाणी नवीन ढापा टाकावा अशी मागणी परिसरातील नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

---

## डॉ.कल्याण काळे मंगळवारी मतदारांशी संवाद साधणार

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**



जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास (इंडिया) आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे हे दि. ३० एप्रिल रोजी भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यातील विविध गावांना भेटी देवून मतदारांची संवाद साधणार आहेत. या दौऱ्यात त्यांच्या प्रचार सभांचेही आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि. ३० एप्रिल रोजी बदनापूर तालुक्यातील वाकुळणी, बाजार वाहेगाव,नाणेगाव, रोषणगाव येथे भेट देवून मतदारांशी संवाद साधणार आहे. त्यानंतर बदना-पूर, जाफ्राबाद आणि भोकरदन तालुक्यात गाठीभेटी सोमठाणा, बाजार गेवराई, रो-षणगाव, सेलगाव या जिल्हा परिषद गटांसह बदनापूर शहराची प्रचार सभा आयोजीत करण्यात आली आहे. दुपारी १ वाजता बदनापूर शहरात विविध भागात भेटी देवून मतदारांशी संवाद साधणार आहेत. सायंकाळी दाभाडी व बावणेपांगरी येथे प्रचार सभा आयोजीत करण्यात आली आहे. तर सायंकाळी ६ वाजता भोकरदन तालुक्यातील हसनाबाद येथे हसनाबाद, राजुर आणि तळेगाव या जिल्हा परिषद गटाची प्रचार सभा आयोजीत करण्यात आली आहे. या सर्व कार्यक्रमास जालना जिल्ह्यातील काँग्रेस, शिवसेना उध्दव ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट या पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांची उपस्थिती राहणार आहे.


---

# माळतोंडीत चक्रीवादळाणे पन्नास घरावरील पत्रे उडाले तर जिप .शाळेची झाली मोडतोड!

## बेमोसमी आवकाळी पाऊसाने आणि संपूर्ण गावाला अवकाळा जिवित हाणी बालबाल बचावली!

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / नागेश कुलकर्णी**

गेल्या हप्ताभरात रोज सध्यकाळी किंवा सकाळी अचानक जोराचा वारा सुटतो कि अचानक मोठमोठ्या थेंबाचा अवकाळी पाऊसाचे सत्र जिल्ह्याभरात सुरू असताना अचानक मंठा तालुक्यातील मौजे माळतोंडी सकाळी सकाळीच चक्रीवाद-ळाणे थैमान घातले या चक्रीव-ादळाने गावातील तब्बल ५० लाखांहून अधिकचे नुकसान झाले आहे . या घटनेची माहिती मिळताच मंठा येथील माजी सभापती संतोष वरकड यांच्याकडून नुकसानीची पाहणी



करत प्रशासनास खबर देत नुकसानीचे पंचनामे करण्याचे केले अवाहन या बाबत सविस्तपणे वृत्त असे की, मंठा तालुक्यातील माळतोंडी गावाला रविवार ता. २८ रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास चक्रीवाद-ळाचा मोठा तडाखा बसला. चक्रीवादळ व बेमोसमी पावसामुळे जिल्हा परिषदेची शाळा पूर्णपणे उध्वस्त झाली, गावातील पन्नासाच्या वर घरा-वरील पत्रे उडून गेले. जणावरांचा चारा कडब्याच्या वळया तसेच सप्ताहाच्या मंडपाचे मोठे नुकसान झाले. गावातील २५ ते ३० विद्युत पोल पडून लोंबकळलेल्या अवस्थेत विद्युत तारा तश्याच आहेत. त्यामुळे ग्रामस्थांच्या जीविकास धोका निर्माण झाला



आहे.चक्रीवादळ व बेमोसमी पाऊस झाल्याची माहिती समजताच माजी सभापती तथा बाजार समितीचे संचालक संतोष वरकड माळतोंडी गावाला भेट दिली व झालेल्या नुकसानीची माहिती घेऊन मंठा तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच विद्युत वितरण कर्मचारी शेतकऱ्यांना सरकारी सोलर पंप योजनेच्या सोलर प्लेटचे नुकसान झाले आहे यामध्ये काही सोलर प्लेट तुटून वाऱ्यामध्ये उडाल्या आहेत तर काही ठिकाणी पूर्ण सोलार सेट तुटलेल्या कंपनीने सेट बदलून देण्यात यावेत अशी शेतकऱ्यांची मागणी आहे . संबंधीत कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांचे भ्रमणध्वनी बंद येत होते. यावेळी सरपंच दत्तराव वरकड व ग्रामस्थ उपस्थित होते.या चक्रीवादळामुळे गावातील सुमारे ५० लाखाचे नुकसान झाल्याची माहिती माजी सभापती संतोष वरकड यांनी दिली. अचानक झालेल्या चक्रीवादळामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. तर जिवित हाणी बालबाल बचावली या चक्रीवादळामुळे व बेमोसमी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून जास्तीत जास्त आर्थिक मदत करावी अशी मागणी माजी सभापती वरकड यांनी यावेळी केली.

## दखल

पंकज जगन्नाथ जयस्वाल

# पंतप्रधान मोदी यांच्या राजवटीत चौफेर विकास

जागतिक अर्थव्यवस्थेच्या विस्तृत चित्रात भारत वेगवान विकासासाठी आणि नवीन उंची गाठण्यासाठी सतत प्रयत्नरत आणि कार्यशील आहे. भारतीय संस्कृतीला प्रदीर्घ परंपरा आहे. १.४ अब्जापेक्षा जास्त लोकसंख्येसह भारत एक आर्थिक महाशक्ती म्हणून विकसित होत जगभरात आपले सकारात्मक आर्थिक मूल्यांकन दाखवत आहे. भारताची अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर महत्त्वाची आहे. त्यात मोठी तरुण लोकसंख्या तसेच खुली लोकशाही राजकीय व्यवस्था आहे. ही सध्या जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था (पीपीपीनुसार) असून जागतिक आर्थिक वाढीसाठी एक प्रमुख योगदानकर्ता आहे. तरीही अजून लक्षणीय अप्रयुक्त क्षमता आहे. जगाच्या लोकसंख्येच्या एक षष्ठांशपेक्षा जास्त असलेल्या जागतिक उत्पादनात भारताचा वाटा जेमतेम ७ टक्के आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताच्या यशाचा जागतिक आर्थिक आणि सामरिक महत्त्वावर जबरदस्त प्रभाव पडेल. २०३५ पर्यंत जागतिक अर्थव्यवस्था आशियाकडे अधिक झुकण्याची अपेक्षा आहे. कारण भारत, चीन आणि आसियान देश मंद गतीने वाढणाऱ्या प्रगत अर्थव्यवस्थांशी संलग्न आहेत. ६ टक्केच्या सरासरी वार्षिक वाढीसह भारताची अर्थव्यवस्था २०१७ च्या तुलनेत दुप्पट मोठी असेल. क्रयशक्तीच्या समानतेच्या दृष्टीने, २०१६ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेतील भारताचा वाटा ७ टक्क्यांवरून २०३५ पर्यंत सुमारे १३ टक्क्यांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे; ज्यामुळे तो युनायटेड स्टेट्सच्या बरोबरीने येईल. सरकारी आकडेवारीनुसार भारताचा जीडीपी वाढीचा दर रशिया, अमेरिका, चीन आणि जपान या प्रमुख देशांपेक्षा जास्त आहे. महामारी सुरू झाल्यापासून गुंतवणूक ते जीडीपी गुणोत्तर वाढवणारी भारत ही एकमेव आशियाई अर्थव्यवस्था आहे. रेमिटन्स वाढल्याने आणि जागतिक सक्षमता केंद्रे उदयास आल्याने आयातीवरील भारताचे अवलंबित्वही कमी झाले आहे. २०२२ पासून रेमिटन्सचे प्रमाणही लक्षणीय वाढले आहे. एकेकाळी भारताची व्याख्या बंदिस्त अर्थव्यवस्था करणाऱ्या वास्तवाऐवजी आज अर्थव्यवस्था चीनपेक्षा अधिक खुली असून विकासाच्या समान पातळीवर आहे. गेल्या दशकात भारताच्या जीडीपीमध्ये व्यापाराचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे; जो १९९० मध्ये १५ टक्क्यांपेक्षा कमी होता.

**गरिबी कमी होणे आणि रोजगार दरात वाढ**

जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या दोघांनी भारताच्या जागतिक दर्जाच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांची प्रशंसा केली आहे; ज्यामुळे सरकारला सामाजिक कार्यक्रमांवर अधिक चांगले लक्ष केंद्रित करण्यात आणि कर अनुपालन वाढविण्यात मदत झाली आहे. जागतिक बँक आंतरराष्ट्रीय दारिद्र्यरेषेनुसार गरिबीची व्याख्या करते; जी अत्यंत गरिबी प्रतिव्यक्ती २.१५ प्रतिदिन, निम्न-मध्यम उत्पन्न ३.६५ आणि उच्च-मध्यम उत्पन्न ६.८५ वर सेट करते. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार, २०११ मध्ये भारताचा गरिबी दर २२.५३ टक्के होता. कोविडनंतरही २०२१ मध्ये तो ११.९ टक्क्यांपर्यंत लक्षणीयरीत्या खाली आला आहे. मानव विकास निर्देशांक प्रगतीचा तुलनात्मक ट्रेंड दर्शवतात.

**पुढील दोन दशकांमध्ये भारताची कार्यरत वयाची लोकसंख्या सुमारे २०० दशलक्ष ते एक अब्जाहून अधिक वाढून जगातील सर्वात मोठी लोकसंख्या बनण्याची अपेक्षा आहे. मोदी सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणात नोकरी शोधणाऱ्यांपेक्षा कुशल तरुण आणि पदवी स्तरावर संशोधन आणि नावीन्यपूर्ण दृष्टिकोन विकसित करून रोजगार निर्माण करणाऱ्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. अशा कृतींमुळे बेरोजगारीचा दर आणखी कमी होईल. काही लोकांच्या लक्षात न आलेले वास्तव म्हणजे भारताने नवकल्पना आणि तंत्रज्ञानामध्ये अधिक प्रगती केली आहे. होय, लोकसंख्याशास्त्राचा देशाला फायदा होतो, परंतु ते जीडीपीचे अनन्य जनरेटर नाही. नवोन्मेष आणि कामगार उत्पादकता वाढवणे हे जगातील पाचव्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण ठरेल.**



फ्लशिंग टॉयलेट आणि स्वयंपाकाचा गॅस, बालमृत्यू दर आणि घरगुती वीज यामध्ये गेल्या दशकभरात लक्षणीय सुधारणा झाली आहे. एक दशकापूर्वी ४० टक्के घरांमध्ये वीज नव्हती. आज हा आकडा तीन टक्केपेक्षाही कमी झाला आहे.

भारतात १११ युनिकॉर्न आहेत; ज्यांचे एकत्रित मूल्य ३४९.६७ अब्ज आहे. २०२१ मध्ये १०२.३० बिलियनच्या एकूण मूल्यासह ४५ युनिकॉर्न जन्माला आले तर २२ युनिकॉर्न २०२२ मध्ये जन्माला आले; ज्यांचे एकूण मूल्य २९.२० अब्ज होते. भारतामध्ये सध्या जगातील तिसरा सर्वात मोठा युनिकॉर्न बेस आहे. सरकार अक्षय ऊर्जेवर काम करीत आहे. २०३० पर्यंत ४० टक्के ऊर्जा गैर-जीवाश्म स्रोतांपासून निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. सरकारी अंदाजानुसार, डिसेंबरपर्यंत 'डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री ॲण्ड इंटरनल ट्रेड'ने अंदाजे १११ युनिकॉर्नसह सुमारे ११७,२५४ स्टार्टअप्सना मान्यता दिली होती. या स्टार्टअप्सनी एकत्रितपणे अंदाजे १.२४ दशलक्ष नोकऱ्या निर्माण केल्या आहेत; ज्याचा महत्त्वपूर्ण आर्थिक परिणाम झाला आहे.

ईपीएफओ ही एक सामाजिक सुरक्षा संस्था आहे, जी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि विविध तरतुदी कायदा, १९५२ च्या नियमांनुसार देशाच्या संघटित कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी, पेन्शन आणि विमा निधीच्या स्वरूपात सामाजिक सुरक्षा लाभ प्रदान करण्यासाठी जबाबदार आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ) अंतर्गत औपचारिक रोजगार निर्मिती मागच्या वर्षी ऑगस्टमध्ये १.६९ दशलक्षवरून १.७२ दशलक्ष झाली. सप्टेंबरमध्ये ०.८९ दशलक्षाहून अधिक नवीन ईपीएफओ सदस्यांची नोंदणी झाली; त्यापैकी ५८.९ टक्के १८ ते २५ वर्षे वयोगटातील होते. यावरून असे दिसून येते की, देशाच्या संघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांमध्ये सामील होणाऱ्या बहुसंख्य व्यक्ती या तरुण आहेत. त्यात बरेचसे प्रथमच कर्मचारी आहेत. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, त्यांच्या सरकारने गेल्या १० वर्षांत मागील प्रशासनाच्या तुलनेत १.५ पट अधिक नोकऱ्या निर्माण केल्या आहेत.

**मोदी सरकारचा पुढाकार**

गेल्या काही वर्षांत भारत सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. भारत सरकार नागरिकांच्या आर्थिक स्थैर्यासाठी तसेच अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण वाढीला लाभदायक ठरणारी धोरणे आणि कार्यक्रम राबविण्यात प्रभावी ठरले आहे. गेल्या काही दशकांमध्ये भारताच्या प्रचंड आर्थिक वाढीमुळे निर्यात मागणीत लक्षणीय वाढ झाली आहे. याव्यतिरिक्त मेक इन इंडिया, स्टार्ट-अप इंडिया, डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटीज मिशन आणि कायाकल्प आणि शहरी परिवर्तनासाठी अटल मिशन यांसारखे सरकारचे अनेक प्रमुख प्रकल्प भारतात मोठ्या संधी निर्माण करण्यासाठी डिझाईन केलेले आहेत. या संदर्भात देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सरकारच्या काही उपाययोजनाखाली सूचिबद्ध आहेत. २२ जानेवारी २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'प्रधानमंत्री सूर्योदय योजना' सुरू केली. या योजनेंतर्गत एक कोटी घरांमध्ये रुफटॉप सोलर पॉवर प्लांट बसवण्यात येणार आहेत.

१७ सप्टेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत केंद्रीय क्षेत्र योजना पीएम-विश्वकर्मा सुरू केली. नवीन योजनेचा उद्देश पारंपरिक कलाकार आणि कारागिरांना ओळखणे आणि प्रोत्साहित करणे आहे; जे त्यांचे हात आणि साधी साधने वापरतात. त्यांच्या उत्पादनांची गुणवत्ता, स्केल आणि पोहोच सुधारणे तसेच त्यांना एमएसएमई मूल्य साखळींमध्ये समाकलित करणे, हे या प्रयत्नाचे उद्दिष्ट आहे.

मागील आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत भारताच्या आर्थिक विकासासाठी भांडवली गुंतवणुकीसाठी सरकारचा अटल पाठिंबा दर्शविला; जो अगोदरच्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत २०२३-२४ मध्ये ३७.४ टक्के जास्त होता. चालू आर्थिक वर्षात महसुली खर्च ते भांडवली परिव्यय गुणोत्तर १.२ टक्क्याने वाढले; जे उच्च दर्जाच्या खर्चाकडे लक्षणीय बदल दर्शवते. नोकरी क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या लाखो भारतीय तरुणांसाठी शिक्षण-प्रशिक्षण आणि नोकरीच्या विकासाला प्रोत्साहन देणारे वातावरण तयार केले तर भारताकडे प्रचंड आर्थिक संधी आहे. पुढील दोन दशकांमध्ये भारताची कार्यरत वयाची लोकसंख्या सुमारे २०० दशलक्ष ते एक अब्जाहून अधिक वाढून जगातील सर्वात मोठी लोकसंख्या बनण्याची अपेक्षा आहे. मोदी सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणात नोकरी शोधणाऱ्यांपेक्षा कुशल तरुण आणि पदवी स्तरावर संशोधन आणि नावीन्यपूर्ण दृष्टिकोन विकसित करून रोजगार निर्माण करणाऱ्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. अशा कृतींमुळे बेरोजगारीचा दर आणखी कमी होईल. काही लोकांच्या लक्षात न आलेले वास्तव म्हणजे भारताने नवकल्पना आणि तंत्रज्ञानामध्ये अधिक प्रगती केली आहे. होय, लोकसंख्याशास्त्राचा देशाला फायदा होतो, परंतु ते जीडीपीचे अनन्य जनरेटर नाही. नवोन्मेष आणि कामगार उत्पादकता वाढवणे हे जगातील पाचव्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण ठरेल. तांत्रिक भाषेत याचा अर्थ भारताच्या अर्थव्यवस्थेतील श्रम आणि भांडवलाचे प्रती युनिट जास्त उत्पादन. २०२१ आणि २०२२ मध्ये दोन वर्षांच्या उच्च आर्थिक वाढीनंतर कॅलेंडर वर्ष २०२३ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था जोरदार वाढली. देशांतर्गत मागणीतील उच्च वाढीमुळे २०२४ मध्ये सतत वेगवान विस्तारासाठी नजिकच्या काळात आर्थिक चक्र अजून मजबूत होईल.

**पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली थेट 'परकीय गुंतवणूक'**

गेल्या चार वर्षांत भारताची जीडीपीच्या प्रमाणात निव्वळ विदेशी थेट गुंतवणूक चीनच्या तिप्पट आहे. १५ वर्षांपूर्वी चीनमधील गुंतवणूक भारतापेक्षा चौपट होती. आंतरराष्ट्रीय ज्ञान असलेले स्थलांतरित अनेकदा थेट परदेशी गुंतवणुकीकडे आकर्षित होतात. मोदी सरकारच्या धोरणांमुळे तरुण लोकसंख्येच्या रचनेमुळे आणि वेगाने वाढणाऱ्या शहरी घरगुती उत्पन्नामुळे भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक दीर्घकालीन विकासाच्या शक्यतेमुळे, गेल्या दशकात भारतात थेट विदेशी गुंतवणूक वाढली आहे. यूएस डॉलरच्या दृष्टीने भारताचा जीडीपी २०२२ मध्ये युएस ३.५ ट्रिलियनवरून २०३० पर्यंत युएस ७.३ ट्रिलियनपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. या जलद आर्थिक विस्तारामुळे २०३० पर्यंत भारतीय जीडीपी जपानी जीडीपीपेक्षा जास्त होईल; ज्यामुळे भारत आशिया-पॅसिफिकमधील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होईल.

'युनायटेड नेशन्स वर्ल्ड इकॉनॉमिक सिच्युएशन ॲण्ड प्रॉस्पेक्ट्स २०२४' च्या अभ्यासानुसार, भारताच्या स्थिर वाढीमुळे २०२४ मध्ये दक्षिण आशियाचा जीडीपी ५.२ टक्के वाढण्याची अपेक्षा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर बँकेचे मुख्य अर्धवार्षिक मूल्यांकन असे नमूद करते की, गंभीर जागतिक चिंता असूनही भारत आर्थिक वर्ष २२-२३ मध्ये ७.२ टक्के वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था होती. जी-२० देशांमध्ये भारताचा विकास दर हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च होता, जो विकसनशील बाजार अर्थव्यवस्थांच्या सरासरीपेक्षा दुप्पट होता. या वाढीला मजबूत देशांतर्गत मागणी, सार्वजनिक पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक आणि वाढत्या आर्थिक उद्योगाने पाठिंबा दिला.

**निष्कर्ष**

संघीय सरकार असलेल्या एवढ्या मोठ्या वैविध्यपूर्ण देशात धोरण बनवण्याची आव्हाने पाहता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक प्रसंगी कठोर परिस्थिती आणि पूर्णपणे समर्थन नसलेल्या विरोधाला न जुमानता वेळोवेळी योग्य निर्णय घेऊन आणि धोरणांची अंमलबजावणी करून १.४ अब्ज लोकांच्या विकासासाठी आपले समर्पण दाखवून दिले आहे. त्यांच्या पहिल्या कार्यकाळात त्यांना वारशाने मिळालेली सुस्त अर्थव्यवस्था हे एक मोठे आव्हान होते, परंतु त्यांनी ते सकारात्मक वाढीचे स्रोत बनवले. जर ते पंतप्रधान राहिले तर भारताला विश्वगुरू बनण्यासाठी पथप्रदर्शक ठरतील. केवळ भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला त्यांची गरज आहे. मतदान करण्यापूर्वी विचार करा आणि नोटा पर्याय निवडणे टाळा.

७८७५२१२१६१

## रविवारची पत्रे

### सार्वजनिक ग्रंथालयाला मदत

एका ट्रक मालकाने चालकाविरुद्ध ट्रकमधून सहा कोटी रुपयांच्या मालाची चोरी केल्याची तक्रार दाखल केली होती. हे चोरी प्रकरण नागपूर उच्च न्यायालयात सुरू होते. ही तक्रार मागे घेत गुन्हाही मागे घेण्याची विनंती ट्रक मालकाने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे केली होती. ट्रक मालकाची विनंती उच्च न्यायालयाने मान्य केली. परंतु या ट्रक मालकाची सरळसरळ सुटका केली नाही. त्यावर काहीतरी शिक्षा देणे गरजेचे होते. या प्रकरणात पोलिस विभागाची फार धावपळ झाली. शासनाचा वेळ वाया गेला त्यावर शिक्षा म्हणून शासकीय ग्रंथालयाला रु. २५,००० दोन आठवड्यात जमा करण्यात यावे, असा आदेश न्यायमूर्तींद्वयाने दिला.

सर्वप्रथम अशा प्रकारचा आगळावेगळा आदेश देणाऱ्या दोन्ही न्यायमूर्तींचे अभिनंदन करायला हवे. आज सार्वजनिक ग्रंथालयांची स्थिती फारच गंभीर आहे. दररोज ग्रंथालय चालवताना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. ग्रंथालयांना शासनाकडून नियमितपणे अनुदान मिळत नाही. मिळाले तर ते तुकड्या तुकड्यात; तेही तुटपुंजे मिळते. याबाबत ग्रंथालय चळवळीत कार्यरत संस्था शासनाशी सतत पत्रव्यवहार करून ग्रंथालयांची स्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देत असते. अशा वेळी नागपूर उच्च न्यायालयाने शिक्षा म्हणून ग्रंथालयाला काही रुपये देण्याचा आदेश दिला, तो खरोखरच कौतुकास्पद आहे. पण निकाल देताना न्यायालयाने शासकीय ग्रंथालयाला देण्याचा आदेश दिला. यावर आक्षेप घेण्याचे कोणतेही कारण नाही. परंतु शासकीय ग्रंथालयाला तसेच तेथील कर्मचाऱ्यांना नियमित अनुदान आणि मासिक वेतन मिळते. म्हणजे पोट भरलेल्या माणसासमोर पंचपक्वान्नाने भरलेले ताट ठेवल्यासारखे वाटते. न्यायालयाला विनंती आहे की, त्यांनी प्रकरणात निर्णय देताना शिक्षा म्हणून काही रक्कम सार्वजनिक ग्रंथालयाला देण्याचा आदेश दिला तर ग्रंथालयाला फार मोठा आधार मिळेल. न्यायालयाने आपल्या परिसरातील वा जिल्ह्यातील कोणत्याही एका सार्वजनिक ग्रंथालयाला रक्कम देण्याचे आदेश दिले तर ते योग्य होईल. (निर्णयांमध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचे नावं दिले तर ते योग्य होईल असे वाटते.) तसेच शिक्षा म्हणून जी रक्कम जमा करायला सांगितली ती रक्कम जमा केल्याची मूळ पावती न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिले तर शिक्षेची अंमलबजावणी झाली, असे समजले जाईल. न्यायालयाने अशाप्रकारची शिक्षा, न्यायालयीन प्रकरणाचे महत्त्व लक्षात घेऊन आदेश दिले तर निश्चितपणे राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना फूल ना फुलाची पाकळी म्हणून मदत होऊ शकेल. जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने यावर न्यायालयाने, वकिलांच्या बार असोसिएशने विचार करावा, ही विनंती.

**रवींद्र पांडे**/९३२५४५७०५२

●● ●●

### नेमेचि येतो पावसाळा

मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी शासकीय स्तरावरून विविध उपक्रम, उपाययोजना, मोहिमा आणि आवाहन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमात सहभागी असणाऱ्या काही कर्मचाऱ्यांनी अतिशय प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने काम केले तर काहींनी केवळ एक तांत्रिक आणि औपचारिक बाब म्हणून यांत्रिकपणे कागद हलवले. हीच स्थिती मतदारांच्या बाबतीतही होती. काही मतदारांनी वेळोवेळी निवडणूक आयोगाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन, त्याला गांभीर्याने घेऊन आपले नाव मतदार यादीमध्ये आहे किंवा नाही, याची खात्री करून घेतली. नसल्यास किंवा काही बदल अपेक्षित असल्यास वेळेपूर्वीच अग्रक्रमाने हे काम करून घेतले तर काहींनी वेळ आहे, बघू नंतर किंवा येतील सरकारी कर्मचारी, ती त्यांची जबाबदारी आहे, असा विचार करून गांभीर्याने घेतले नाही. या व्यवस्थांचा उपयोग करून प्रत्यक्ष सत्ताकारण करणारे राजकीय पक्षसुद्धा याला अपवाद कसे राहतील? त्यांच्यातही काही नेत्यांकडून आणि कार्यकर्त्यांकडून प्रामाणिक प्रयत्न झाले तर काही नेते केवळ मंचावरून भाषणे ठोकणे, आरोप-प्रत्यारोप करणे, काही कार्यकर्ते चमकोगिरी करणे आणि नेत्यांसमोर घोषणाबाजी करणे यातच मग्न राहिले. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' याप्रमाणे प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे अनुभव येतात. शासकीय यंत्रणा, राजकीय पक्ष आणि मतदार या सर्व स्तरांवर मतदार यादीमधील तपशील ही बाब गांभीर्याने घेतली जात नाही आणि मग एकमेकांचे दोष दाखवत मतदानातील कमी टक्केवारीच्या कारणांचा ऊहापोह केला जातो. 'नेमेचि येतो पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा' या काव्यपंक्तीप्रमाणे हे सारे नेहमीचेच झाल्यामुळे आपल्याला त्याचे वैषम्य वाटेनासे झाले आहे. या सर्व बाबी सर्वांच्या इतक्या अंगवळणी पडल्या आहेत की, हे सारे न झाले तरच नवल! असे म्हणण्याची पाळी आली आहे. प्रशासन, त्यातील कर्मचारी, राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते आणि सामान्य मतदार या सर्वच ठिकाणी लोकशाही प्रणालीबाबत आणि व्यवस्थांबाबत असलेली उदासीनता या गोंधळाला कारणीभूत ठरते आहे. काम करायचे म्हणून करायचे किंवा जाऊ द्या. करणारे करतील ही मनोवृत्ती बदलल्याशिवाय हा सारा गोंधळ टाळणे, ही परिस्थिती बदलणे शक्य नाही. कोणी काय करायला हवे होते किंवा कुणाच्या हलगर्जीपणाने काय घडले, याचा विचार करण्याआधी या सर्व बाबी गृहीत धरून या परिस्थितीत मी माझ्याकडून काय करू शकतो, याचा विचार करणे आणि त्यानुसार कृती करणे आवश्यक आहे.

**प्रसाद पोफळी**/९८२२५६९६४८

●● ●●

### राजकीय पक्षांचीही जबाबदारी आहेच!

नागपूर लोकसभा निवडणूक प्रक्रियेत मतदानाच्या दिवशी सरकारी यंत्रणेकडून झालेल्या चुकांच्या संदर्भात त.भा.च्या 'आपलं नागपूर'मधील बातमी वाचली; ज्यात कुचकामी सरकारी यंत्रणा तसेच मतदार याद्यांमधील घोळ इत्यादी विषयांवर बरंच काही वाचावयास मिळालं. या संदर्भात मला असं सुचवावसं वाटतं की, संदर्भित विषयाला हाताळणाऱ्या सरकारी यंत्रणेला मतदान प्रक्रियेत झालेल्या घोळासाठी पूर्णपणे जबाबदार ठरवणे हे काही योग्य नाही. या विषयात सरकारी यंत्रणेमध्ये काम करणारे अधिकारी, कर्मचारी इत्यादी मंडळी काय परिस्थितीत कामं करतात, हे ते काम करणाऱ्यांनाच ठाऊक असतं. म्हणून सरकारी यंत्रणेलाच विनाकारण दोष देऊन चालणार नाही. या संदर्भात आपण हे पण समजून घ्यायला हवे की, या निवडणूक प्रक्रियेत सरकारी यंत्रणेसोबतच प्रमुख राजकीय पक्षाचे कार्यकर्तेसुद्धा सोबत कार्यरत असतात. आपण बघतो की, या प्रमुख राजकीय पक्षामध्ये डझनभरपेक्षाही जास्त अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि शेकडोंनी विविध पदांवरचे पदाधिकारी असतात. या मंडळींना हे समजून घ्यायची गरज आहे की, फक्त आपल्या निहित स्वार्थासाठी पक्षात पदं मिळवून चालत नसतं तर त्यासाठी जनसामान्यांच्या विविध समस्या सोडविण्याची जबाबदारी घ्यावी लागते. या मंडळींनी आपापल्या वॉर्डांत, प्रभागांत सगळ्या मतदारांना त्यांच्या मतदान केंद्रांची, बुथची माहिती देण्याची जबाबदारी स्वीकारावयास हवी होती आणि नेमकं तेच झालं नाही. नागपूरचे अनेक मतदार मतदानाची इच्छा असतानाही मतदानापासून वंचित राहिले. या बाबतीत संबंधित राजकीय पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या हलगर्जीपणाची चौकशी करणे नक्कीच गरजेचे आहे. अन्यथा नागपूरमधील विकास कामांची गती बघितली तर नागपूरमध्ये यावेळी ६५ टक्के तरी मतदान व्हावयास हवे होते, पण ते झालं नाही. असो, जे झालं ते झालं; पण यापुढे होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत तरी असा घोळ होणार नाही आणि मतदान करू इच्छिणाऱ्या आपल्या नागपूरच्या मतदारांना पुन्हा अशी गैरसोय होणार नाही, याची काळजी संबंधित सरकारी यंत्रणा तसेच प्रमुख राजकीय पक्ष घेतील हीच अपेक्षा.

**अनंत मधुकर मुंजे**/९०२८४००२२७

●● ●●

### सुधारणा करण्याची आवश्यकता

पुन्हा एकदा अनेक मतदारांची नावे मतदार यादीतून गायब असल्याचे अनुभवास आले. याला मुख्य कारण म्हणजे निवडणूक आयोगाकडे कायमस्वरूपी मनुष्यबळ नाही, तो वेगवेगळ्या विभागातील सरकारी कर्मचाऱ्यांकडून विशेषतः शिक्षकांकडून तात्पुरत्या स्वरूपात कामे करून घेत असतो. शिक्षकांचे किंवा अशा कर्मचाऱ्यांचे हे मूळ काम नसल्याने स्वाभाविकच ते मतदार यादीचे काम अपवाद सोडल्यास फार आत्मीयतेने व गांभीर्याने करीत नसतात. शिक्षकांकडे मतदार यादीचे काम सोपविल्याने विद्यार्थ्यांचेही शैक्षणिक नुकसान होत असते. मतदार यादीचे काम करणारे कर्मचारी ज्यावेळी या कामासाठी घरोघरी जातात, त्यावेळी त्यांच्याजवळ अद्ययावत साधने जसे मतदार यादीचे सॉफ्टवेअर, टॅबलेट अथवा लॅपटॉप दिलेले नसतात. हे कर्मचारी घरोघरी जाऊन कागदी फॉर्म भरून घेत ते निवडणूक आयोगाकडे सोपवित असतात. निवडणूक आयोगाकडे हे फॉर्म सोपवल्यानंतर अपुऱ्या मनुष्यबळामुळे कदाचित आयोगाचे संबंधित कर्मचारी त्याची दखल घेऊ शकत नसावेत व त्यामुळेच प्रत्येकच लोकसभा, विधानसभा अथवा महानगर पालिका निवडणुकीदरम्यान मतदार यादीतून असंख्य मतदारांची नावे गाळलेली आढळतात अथवा निधन होऊन अनेक वर्षे उलटूनही त्यांची नावे मतदार यादीत कायम असतात. अनेकदा मतदार राहतो, त्या ठिकाणापासून दूर असलेल्या मतदान केंद्रावर त्याचे नाव समाविष्ट झालेले असते, जे त्याला अपेक्षित नसते. परिणामी तो मतदानास जाण्याचे टाळतो. याचा परिणाम मतदानाची टक्केवारी घसरण्यावर होत असतो. नोकरी-व्यवसायानिमित्त अनेकांना वेगवेगळ्या गावी राहावे लागते. नोकरीत बदलीची शक्यता असेल, तर अशा व्यक्तीने मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याच्या भानगडीत पडूनही उपयोग नसतो. कारण, प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी तो त्या गावात अथवा शहरात राहीलच, याची शाश्वती नसते. निवडणुकांच्या वेळी आपल्या मूळ गावी परत येणे अनेकांना शक्य होत नाही. परिणामी त्यांची नावे समाविष्ट होऊ शकत नाहीत. अनेकांच्या प्रवासाचे नियोजन फार पूर्वीच झालेले असल्याने तेही मतदानापासून वंचित राहतात. यामुळे मतदार यादी तयार करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते. मतदार यादी ही कोअर बँकिंग पद्धतीप्रमाणे असावी; म्हणजेच ज्याप्रमाणे बँकेचा एखादा खातेदार त्याचे खाते बँकेच्या कुठल्याही शाखेत असले, तरी तो देशातील अन्य कुठल्याही शहरातून अथवा गावातून आपल्या खात्यावर व्यवहार करू शकतो, त्याचप्रमाणे मतदाराचे नाव एकदा मतदार यादीत समाविष्ट झाल्यानंतर तो देशातील कुठल्याही शहरातून अथवा गावातून मतदान करू शकला पाहिजे. संपूर्ण देशाची एकच मतदार यादी असावी आदी उपाययोजना करावी. प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी छापील याद्यांचा वापर न करता सॉफ्टवेअरच्या माध्यमातूनच मतदान प्रक्रिया राबवावी लागेल. हे करताना मृत व्यक्तीचे मृत्यू प्रमाणपत्र तयार होताच त्याचे आधार कार्ड, पॅन कार्ड व मतदार यादीतील नाव निरस्त होईल, याची व्यवस्था भारत सरकारला करावी लागेल.

**पिनाक दलाल**/नागपूर

●● ●●

### 'तुया गावात कोण चाल्ला गा !'

देशाला पंतप्रधान देणाऱ्या रामटेक लोकसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी ६१ होती. २०१९ मध्ये ११,९७,८०५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. यावेळी १२,२०,८४४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. अधिक मतदान झाल्यामुळे कोण निवडून येईल, हे मात्र गुलदस्त्यात आहे. या मतदारसंघात एकूण २८ उमेदवार रिंगणात होते. मात्र, खरी लढत महायुतीचे उमेदवार राजू पारवे, काँग्रेसचे उमेदवार श्याम बर्वे आणि वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार किशोर गजभिये यांच्यातच झाली आहे. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार किशोर गजभिये हे किती मते घेणार यावर महायुतीचे उमेदवार राजू पारवे, काँग्रेसचे उमेदवार श्याम बर्वे यांचे भवितव्य अवलंबून आहे. रामटेक लोकसभा मतदारसंघ नागपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विखुरलेला आहे. यात रामटेक, काटोल, सावनेर, हिंगणा, उमरेड, कामठी हे सहा विधानसभा मतदारसंघ येतात. पैकी काटोलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिल देशमुख, सावनेरमध्ये काँग्रेसचे सुनील केदार आमदार आहेत. उमरेडमध्ये राजू पारवे काँग्रेसचे आमदार होते. पण, आता त्यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला असून ते लोकसभेचे उमेदवार आहेत. हिंगण्यातून समीर मेघे आणि कामठीतून टेकचंद सावरकर हे दोन भाजपाचे आमदार आहेत. रामटेकमध्ये आशिष जयस्वाल हे अपक्ष आमदार असून त्यांचा पाठिंबा एकनाथ शिंदे गटाला आहे. बुथनिहाय मतदानाचे आकडे जाहीर झाले असल्याने शिवसेना आणि काँग्रेसच्या वतीने आपल्याला किती मते पडली व विरोधकांना किती, याची आकडेमोड केली जात आहे. साधारणतः बुथवरच्या मतदानावरूनच जय-पराजयचा अंदाज बांधला जातो. लग्न सोहळ्यांची धूम कायमच असून गावोगावचे नातेवाईक एकत्र येऊ लागले. प्रत्येक जण एकमेकाला 'तुया गावात कोण चाल्ला गा' असे विचारू लागले आहे. कुणी शिवसेना (शिंदे गट) तर कुणी काँग्रेस तर कुणी वंचित बहुजन आघाडीचे नावे सांगू लागल्याने उमेदवारांची चिंता वाढली आहे. प्रत्येक उमेदवार मतदानाच्या टक्केवारीवरून आपले अंदाज बांधू लागला आहे. शिवसेना (शिंदे गट) आणि काँग्रेसच्या उमेदवारांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत बैठका घेऊन कल जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पण गावगाड्यातील चर्चा थांबलेल्या नाहीत. मतदान झाल्याने आजवर शांत आणि काहीसा अबोल असलेला मतदारही आता व्यक्त होऊ लागला आहे. चर्चांमधून वाद वाढल्याचीही उदाहरणे आहेत.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

●● ●●

### बँक केवायसीचा फटका

बँकेत खाते उघडताना केवायसीचा फॉर्म भरून घेतला जातो. यामध्ये मुख्यत्वे आधारकार्ड, पॅनकार्डची झेरॉक्स मागितली जाते. आधार क्रमांकावरून ग्राहकाचा पत्ता, जन्म तारीख प्राप्त होत असते. पॅनकार्ड हे आर्थिक व्यवहाराशी संबंधित असतात. आधार क्रमांकावरून सर्व प्रकारांच्या आर्थिक व्यवहाराची माहिती एका क्लिकवर प्राप्त होत असते. या सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरच बँकेत ग्राहकाचे खाते उघडले जाते. असे असताना परत परत केवायसी अपडेट करण्याची काही ठोस कारणं असावीत, असे वाटत नाही. आपण बँकेला दिलेल्या माहितीत काही बदल झाला असेल तरच ग्राहकांना केवायसी अपडेट करणे गरजेचे असले पाहिजे. याबाबत आम्हाला बँकेचा मोठा वाईट अनुभव घ्यावा लागला. आमचे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा राजुरा, जिल्हा चंद्रपूरमध्ये सेव्हिंग खाते आहे. सर्व दैनंदिन आर्थिक व्यवहार हे याच खात्यामार्फत होत असतात. याच खात्यातून बँकेचे ऑनलाईचे व्यवहार केले जातात. असे असतानाही बँकेकडून कुठलेही ठोस कारण न देता या खात्यातील व्यवहार १०-१२ दिवसांपासून गोठविण्यात आलेले आहेत. यावेळी आम्ही लग्नासाठी आणि जवळपासच्या तीर्थक्षेत्रांना भेट देण्यासाठी बाहेरगावी गेलो होतो. बँकेचा गुगल पेमार्फत फक्त मेसेज प्राप्त होत होता. त्यात आपल्या शाखेला भेट देण्याचे सुचविले होते. बाहेरगावी असल्याने आम्हाला बँकेच्या शाखेला भेट देणे शक्य नव्हते. आमचे सर्व आर्थिक व्यवहार याच खात्यावर अवलंबून असल्याने आणि या खात्यातच रक्कम जमा असूनही आमची खूप फजिती झाली. आमच्या खात्यात पैसे असूनही ते आम्हाला वापरता आले नाहीत. एटीएममधून पैसे निघत नव्हते. कुठलेही ऑनलाईन व्यवहार होत नसल्याने आर्थिक व्यवहार करणे अशक्यप्राय गोष्ट झाली होती. अशावेळी इतरांकडून पैसे प्राप्त करणे भाग पडले. यामुळे आमची आर्थिक कुचंबणा झाली. असे न घडो की बाहेरगावी असताना कुणाची तब्येत बिघडली किंवा अघटित घटना घडली आणि दवाखान्यात भरती करण्याचे काम पडले तर पैसे कुणाला मागणार? सर्व सोंग करता येतात, परंतु पैशाचे सोंग करता येत नाही. आपल्या अडचणीच्या वेळेस आपला पैसा आपल्या कामात यावा यासाठीच आपण खात्यात पैसे जमा करीत असतो. याची साधी जाणीव बँक व्यवस्थापनास आणि बँकेवर नियंत्रण ठेवणाऱ्या रिझर्व्ह बँकेस होत नसेल तर ही अत्यंत निषेधार्ह आणि दुर्दैवी बाब ठरते. या चुकीच्या नियमांची दखल रिझर्व्ह बँकेने त्वरित घ्यावी आणि या नियमात सुधारणा घडवून आणावी, असे आवाहन मी याद्वारे करीत आहे. बँकेचे नियम हे खातेधारकांना सोयीचे असले पाहिजेत न की अडचणीचे! या चुकीच्या नियमांची कुणीतरी दखल घेणे गरजेचे झाले आहे.

**माधुरी मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

●● ●●

### वाहिन्यांवरील रटाळ मालिका

मराठी वाहिनीवर बऱ्याच दिवसांपासून चालू असलेल्या दोन मालिका म्हणजे 'अप्पी आमची कलेक्टर' व 'सातव्या मुलीची सातवी मुलगी.' जेव्हा या दोन्ही मालिका सुरू झाल्या तेव्हा यात नवीन पाहण्यासारखे असेल असे वाटत होते. अप्पी आमची कलेक्टर या मालिकेत अप्पी कलेक्टर झाल्यानंतर कलेक्टरचा दबदबा, नवीन कार्य शैली, नवीन नवीन योजनांद्वारे समाजात काही नवीन प्रकारची क्रांती घडविली जाईल व अप्पी एक जबरदस्त स्त्री व आदर्श कलेक्टर म्हणून कार्य करेल, असे वाटत होते. पण इतर मालिकांप्रमाणे प्रेमात व संसारिक झगडे यात गुरफटणे व मालिकेला नवीन दिशेकडे वाहवत नेणे हे दर्शविण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यामुळे ही मालिका आता कंटाळवाणी वाटल्यास नवीन नाही. तसेच दुसरी मालिका म्हणजे सातव्या मुलीची सातवी मुलगी. प्रथम प्रथम या मालिकेच्या नावाचा अर्थच आकलन झाला नाही. सातवी मुलगी तिची सातवी मुलगीच का? असा प्रश्न पडला. याला काही अर्थ आहे का? बाकीच्या सहा मुलींचे काय? सातवीच का? याचा काही उलगडा होईल असे वाटत होते. पण जसजशी मालिका पुढे सरकत गेली तस तशी निराशा वाटायला लागली. इथेही प्रेमात पडणे, घर संसार वाचविणे तोच प्रकार. नेत्रा जी मालिकेतील नायिका आहे जिच्यात एक देवीची शक्ती आहे. पुढे काय होणार याची कल्पना तिला येत होती. त्या गोष्टीत एक दोन घटना दर्शवून तिच्यातील देवीची शक्ती दर्शविण्याचा प्रयत्न केला गेला पण पुढे ही मालिका अंधश्रद्धेच्या वाटेने चालू राहिली. कोण त्रेता युगातील रूपालीच्या रूपाने राक्षस घरात वावरू लागला. तिचा सेवक म्हणून एक नागिणीचा मालिकेत प्रवेश व एक दुष्टचक्र सुरू होते पण नेत्रा जिला देवीची शक्ती प्राप्त असते ती काहीच करू शकत नाही, याचेही नवल वाटते. त्रेतायुग कुठे व आता कलियुग असताना ज्या घटना त्रेतायुगात घडल्या त्याचा परिपाक कलियुगात दाखविण्याचा प्रयत्न का? जे अनाकलनीय वाटते व शेवट केव्हा होणार आणि काय होणार या उत्सुकतेपोटी प्रेक्षक मालिका जागरण करून पहात होते पण शेवटी वाटायला लागले की ही कंटाळवाणी मालिका कुठेतरी थांबेल व सातव्या मुलीची सातवी मुलगी या विधानाचा अर्थ समजेल. परंतु तो अजूनपर्यंत काही समजला नाही.

**मधुसूदन भावे**/इंदूर

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No 46878/87

# १३ मे रोजी मतदान करायला घराबाहेर पडा

## जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कळकळीचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ एप्रिल**

सोमवार दिनांक १३ मे रोजी बीड लोकसभा मतदारसंघात मतदान असून मतदान करण्यासाठी मतदार नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे कळकळीचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी मतदान जनजागृतीसाठी आयोजित सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मतदारांमध्ये मतदानाचा जागर करण्यासाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. खर्च निरीक्षक सुशांत कुमार बिस्वास हे या मतदार जागृत सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात आवर्जून उपस्थित होते. आज बीड लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा बीड, केज, माजलगाव, आष्टी, परळी, गेवराई या विधानसभा मतदार संघांमध्ये ही सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीला मतदार नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

त्यापुढे म्हणाल्या, बीड लोकसभा मतदार संघातील जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्हा परिषद, पोलीस विभागातील सर्वच अधिकारी, कर्मचारी असे जवळपास १५००० विविध शासकीय सेवेतील अधिकारी, कर्मचारी दिवस-रात्र निवडणुकीच्या विविध जबाबदारीचे वहन करीत आहेत. ही जबाबदारी मतदार नागरिकांनी मतदान करण्यासाठी पार पाडीत आहेत. मतदारांनी सोमवार दिनांक १३ मे रोजी घराबाहेर पडून मतदान करून मतदानाचा आपला हक्क बजवावा, असे कळकळीचे आवाहन त्यांनी यावेळी केले.भारतीय राज्यव्यवस्था न्यायपालिका, विधायिका, कार्यपालिका या तीन महत्त्वपूर्ण स्तंभांवर उभी असून कार्यपालिका म्हणून जिल्हा प्रशासन निवडणुकीचे काम चोख पार पाडत आहे. तर संसदेत पाठवण्याची जबाबदारी मतदारांची आहे मतदारांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होऊन योग्य उमेदवार निवडून संसदेत पाठवावा आणि लोकशाही बळकट करावी, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. मागील दोन टप्प्यात मतदानाचा टक्का घसरल्याने बीडकरांनी मतदानात सक्रिय सहभागी होऊन बीडची जनता लोकशाही प्रिय आहे हे सिद्ध करून दाखवावे, असेही ते यावेळी म्हणाल्या.

# अवैद्य व चोरटी दारू विक्री करणारा आरोपीवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ एप्रिल**

पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी लोकसभा सार्वत्रीक निवडणूक-२०२४ सुरळीत व शांततेत पार पडाव्यात म्हणून जास्तीत जास्त अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहेत. त्यावरून संतोष साबळे पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी आपल्या अधिपत्याखालील पथकाला तसे आदेश दिल्या वरून पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर मुरकुटे यांचे पथक दिनांक २८/०४/२०२४ रोजी भल्या पहाटेपासूनच अवैध धंदे करणाऱ्यांची माहिती काढत पिंपळनेर हद्दीत गस्त करत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत मिळाली की,बोरफडी गावातील बस स्टँड वरील हॉटेल धुळदेव च्या पाठीमागे एक इसम अवैधरित्या दारूची विक्री करत आहे,अशी बातमी मिळाले वरून बातमीचे ठिकाणी सकाळी ०९.३० वाजता एलसीबीच्या पथकाने छापा टाकला असता त्या ठिकाणी इसम नामे भिवाजी भास्कर खांडेकर रा.बोरफडी ता. जि.बीड हा देशी दारू बाबी संत्रा कंपनीच्या २१३, (९०-चङ) च्या बाटल्या किंमती १०,६५०/- रू.चा मुद्देमाल जवळ बाळगून त्याची चोरटी विक्री करीत असताना मिळून आल्याने त्यास मुद्देमालासह ताब्यात घेऊन त्याचे विरुद्ध पोलीस हवलदार राहुल शिंदे यांचे फिर्यादीवरून गुन्हा दाखल करून पुढील तपास कामी पोलीस ठाणे पिंपळनेर यांचे ताब्यात देण्यात आल्याने LCB पथकाचे बोरफडी गावात व परिसरात जनतेतून कौतुक होत आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संतोष साबळे पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, पोलीस उप निरीक्षक श्री.सिध्देश्वर मुरकुटे, सफौ/ तुळशिराम जगताप, पोह/ पी.टी.चव्हाण, पोह/विकास राठोड, पोह/राहुल शिंदे, पोना/ बाळु सानप, चालक पोशि/नामदेव उगले यांनी केलेली आहे.

# मनोज जरांगेंच्या भेटीने बजरंग सोनवणे आनंदीत

## नारळी सप्ताहास उपस्थित राहून घेतले आशीर्वाद



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२८ एप्रिल**

सिरस मार्ग येथे नारायणगडावर आयोजित नारळी सप्ताहास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी उपस्थिती लावून आशीर्वाद घेतले. यावेळी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीने बजरंग सोनवणे आनंदीत झाले. सोनवणेंनी त्यांच्या तब्येतीची विचारपूस करीत आजचा दिवस भरून पावल्याच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी ह.भ. प. विठ्ठल महाराजांचे आशीर्वाद घेऊन त्यांनी भविकांशी संवाद साधला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी प्रचाराला गती दिली असून प्रत्येक तालुक्यात दौरे सुरू आहेत. त्यांनी रविवारी तांदळवाडी भिल्ल येथे गहिनीनाथ गडावर नारळी सप्ताह व सिरस मार्ग येथे नारायणगडावर नारळी सप्ताहास उपस्थिती लावली. यावेळी महाराष्ट्राच्या व देशाच्या इतिहासात आंदोलनाचा धगधगता इतिहास देशासमोर ठेवणाऱ्या मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीने बजरंग सोनवणे हे आनंदीत झाले. सोनवणे यांनी मनोज जरांगे यांच्या तब्येतीची विचारपूस करीत हितगुज केले. त्यांच्या भेटीने आजचा दिवस भरून पावल्याच्या भावना बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केल्या.

या नारळी सप्ताहात ह. भ. प. शिवाजी महाराज व ह.भ.प. विठ्ठल महाराज यांचे आशीर्वाद घेत त्यांनी उपस्थित असलेल्या असंख्य भाविकांशी संवाद साधला. त्याचबरोबर महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार बदामराव पंडित यांच्यासह इंडिया आघाडीतील मित्रपक्षांचे पदाधिकारी व भाविक उपस्थित होते.

महाश्रमणजी महाराजांचे घेतले शुभाशीर्वाद

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह पेंडगाव येथे जैन धर्मातील तेरापंथचे आचार्य युगप्रधान श्री महाश्रमणजी महाराज यांचे दर्शन घेऊन शुभाशीर्वाद घेतले.

# मराठाबहूल गावांनी दिला पंकजाताई मुंडेंना शब्द ; प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२८ एप्रिल**

ताई, तुमचं नेतृत्व सर्वमान्य आहे, तुमच्याकडे विकासाचं एक व्हिजन आहे. तुम्ही अठरापगड जातींना सोबत घेऊन काम करता, त्यामुळे तुमच्यासारख्या नेतृत्वाची आज जिल्हयाला गरज आहे, तुम्हाला प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी आम्ही कठोर मेहनत घेऊ अशा शब्दांत मराठाबहूल गावांनी भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्यासाठी आपला निर्धार व्यक्त केला. तथापि, माझ्या गॅरंटीवर विश्वास ठेवा, तुमच्या न्याय हक्कासाठी मी मागे हटणार नाही असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला.

पंकजाताई मुंडे यांनी शुक्रवारी घाटनांदूर, पट्टीवडगांव, जवळगाव, पुस, वाघाळा तसेच बर्दापूर सर्कलमधील गावांचा दौरा करून मतदारांच्या गाठीभेटी घेत थेट संवाद साधला त्यावेळी मतदारांनी त्यांच्या विजयाचा आपला निर्धार स्पष्टपणे बोलून दाखवला.हा भाग माझ्या हक्काचा आहे. लोकनेते मुंडे साहेबांच्या राजकारणाची सुरवात इथूनच झाली, त्यांचेवर तुम्ही जीवापाड प्रेम केलं. त्यांच्यासारखं कणखर नेतृत्व तुम्ही निर्माण केलं, त्यांच्या पश्चात माझ्या पाठिमागेही तुम्ही ताकद उभी केली. आज मी लोकसभेसाठी उभी आहे. मी उमेदवार म्हणून कशी आहे?मला कशामुळे मत देणार? असा सवाल त्यांनी केला. यावर उपस्थितांनी त्यांच्या जमेच्या बाजू सांगून विकास करण्याची धमक केवळ तुमच्यामध्ये आहे असे म्हटले, यावर त्या म्हणाल्या, मला मतं देण्याची



दहा कारणं असतील पण द्यायच नाही यासाठी कोणतच कारण नाहीय. निवडणूकीत विरोधक माझेवर कोणतेही आरोप करतील. त्यांचेकडे दुसरे मुद्दे नाहीत. मुस्लिम, मराठा समाज बांधवांना ते बुध्दीभेद करून भिती घालतात, पण अशांना बळी पडू नका.मी जातीच नाही पण जिल्हयाच्या मातीचं नशीब नक्की बदलू शकते.

सन्मानजनक विजय हवा

मतदारसंघातील एकही गाव असे नाही, जिथे मी निधी दिला नाही. मला अजून खूप करायचयं. मुंडे साहेबांचं अधुरं स्वप्न पूर्ण करायच आहे. त्यासाठी आपल्याकडून मला सन्मानजनक विजय हवा आहे. ही संधी दवडू नका.नरेंद्र पुन्हा पंतप्रधान होणार आहेत.माझ्या गॅरंटी वर विश्वास ठेवा. कोण न्याय देऊ शकतो? हे ओळखून मला आशीर्वाद द्या असं आवाहन पंकजाताईंनी यावेळी केलं.

# स्व.मुंडे साहेबांनी खूप प्रेम दिलय, त्या उपकाराची परतफेड करूया-आमदार पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२८ एप्रिल**

विकास आणि विश्वास हेच आमचे नाते राहीले असून, स्व. मुंडे साहेबांनी जातीची गणिती मांडून राजकारण केले नाही. मात्र, सध्या बीड जिल्ह्यातील शरद पवारांची राष्ट्रवादी अपप्रचार, बुद्धीभेद करून, दोन समाजात तेढ निर्माण करीत आहेत. परंतू , बीड जिल्ह्यातील मायबाप जनतेने जातीय रंग देणाऱ्यांना धडा शिकवून, विकासाची जात बघून मतदान करून,मला एक संधी द्यावी, असे आवाहन बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी येथे बोलताना केले.



दरम्यान, कामा मुळे लक्षात राहीले पाहिजे. मुंडे साहेबांवर गेवराई ने खूप प्रेम केलय. पालकमंत्री असताना उतराई होण्याचा प्रयत्न मी केलाय. आमदार लक्ष्मण पवार यांचा शब्द कधी पडू दिला नाही. असे सांगून, पंकजा मुंडे यांनी शक्ती प्रमुखांचा क्लास घेऊन कार्यकर्त्यांना केले जबरदस्त चार्ज केले. थेट दुहेरी संवाद साधून पंकजा मुंडे यांनी बैठकीचा मूड चेंज केला. तर, आमदार लक्ष्मण पवार यांनी अभ्यासपूर्ण भाषण करून, मतदारसंघाचा आढावा घेतला. स्व. मुंडे, पंकजाताई मुंडे यांनी भरभरून दिलय, हे प्रमाणीकपणे कबूल करून, आता आपला धर्म इमानदारीने पाळुन ताईंना दिल्लीत पाठवा, असे आवाहन आमदार. पवार यांनी केले.बीड लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्ष व महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ , गेवराई शहरात रविवार ता. २८ रोजी दु. २ वाजता,गेवराई विधानसभा मतदारसंघातील सुपर वारियर्स, शक्तीकेंद्र प्रमुख, बुथप्रमुखासह प्रमुख पदाधिकाऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर आ.लक्ष्मण पवार, संघटनमंत्री संजय कौडगे, भाजप नेते मोहनराव जगताप, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, ऍड.सुरेश हात्ते, जे.डी. शहा, शिवसेना तालुका प्रमुख शिनुभाऊ बेदरे, सतीश पाटील, युवानेते शिवराज पवार, म.न.से. अध्यक्ष जयदीप गोल्हार, भाजपा अध्यक्षा रत्नमाला मोटे, नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, ब्रम्हदेव धुरंधरे, उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, राहुल खंडागळे,दादासाहेब गिरी, मधुकर वादे, याहयां खान, प्रा. कुंड यांची उपस्थिती होती.पंकजाताई मुंडे या वेळी बोलताना म्हणाल्या की, भाजपाची खरी ताकद बुथ प्रमुख, वॉरियर्स ,शक्ती प्रमुख आणि पक्षाचे कार्यकर्ते आहेत. तुम्ही, गावात जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्हिजन, त्यांची यशस्वी दहा वर्ष, केलेली लोकोपयोगी कामे सांगायची आहेत. विकास आणि विश्वास हेच आपले नाते आहे. जातीय तेढ निर्माण करणारांना थारा देऊ नका, आपण कधीही जातीच्या आधारावर मते मागीतली नाहीत. हा आपला, तो परका, असा भेद कधीही केला नाही.



स्व. मुंडे साहेबांनी, खासदार प्रितमताई आणि मी, आम्ही इमानदारीने काम केलय. पालकमंत्री म्हणून काम करत असताना आमदारांना भरपूर निधी दिला. आमदार लक्ष्मण आण्णांनी मागीतला तेवढे निधी दिला म्हणून गेवराई मतदारसंघात आज आण्णांच्या माध्यमातून झालेला विकास दिसतोय. एक संधी द्या, बीड चा खासदार म्हणून तुम्हाला अभिमान वाटेल असे काम करीन, असा विश्वास ही पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त करून, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कुशल नेतृत्वाखाली बीड विकास करण्यासाठी मला निवडून द्या, असे आवाहन ही पंकजाताई यांनी शेवटी बोलताना केले.आमदार पवार म्हणाले,

मोदीजी, स्व. मुंडे आणि पंकजाताई यांनी जी कामे केली. त्या कामाचे मूल्यमापन करण्याची गरज निर्माण झाली असून, गेवराई मतदारसंघात जो विकास झालाय, तो ताईंच्या मदतीने झालाय. म्हणून, बीडचा खासदार ताई च्या रूपाने मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन आमदार पवार यांनी केले.

भाजपाचा कणा हा कार्यकर्त्या आहे. गेवराई मतदारसंघात नदीजोड प्रकल्प, सिंधफणेत पाणी आणायची ताकद खंबीर नेतृत्व म्हणून पंकजाताई यांच्यात आहे. गेवराई मतदारसंघाला ताईनी पालकमंत्री म्हणून खूप मदत केली. आता परतफेड करायची वेळ आलीय, स्व. मुंडे साहेबांनी आणि ताईनी गेवराई मतदारसंघातील लोकांवर खूप प्रेम केलय, त्या उपकाराची परतफेड करून बीड जिल्ह्यात नवा इतिहास करा आणि सर्वाधिक मताधिक्य गेवराई मतदारसंघातून द्या, असे आवाहन ही शेवटी आमदार लक्ष्मण पवार यांनी केले. यावेळी मोहनराव जगताप, राजेंद्र मस्के, ड. सुरेश हात्ते यांची भाषणे झाले. ज्येष्ठ पत्रकार जेडी शहा यांनी पंकजा मुंडे बीड लोकसभेत, बीड ची लक्ष्मी म्हणून प्रवेश करतील, त्यांना आशीर्वाद द्या, असे आवाहन केले. संचलन पत्रकार सुशिल टकले यांनी केले. कार्यक्रमास भाजपाचे बुथप्रमुख, सुपरवारियर्स, शक्तीकेद्र प्रमुख, पदाधिकाऱ्यांसह नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# माजलगावात दीक्षार्थी अंजली जैन यांची भव्य शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ एप्रिल**

छत्रपती संभाजीनगरची कु.अंजली जैन यांचा जैन परंपरेनुसार 'जैन भागवती दीक्षा महोत्सव' सोहळा माजलगाव येथे आज रविवारी दिनांक २८ एप्रिल रोजी होणार आहे. याच अनुषंगाने काल दिनांक २७ एप्रिल रोजी माजलगाव नगरीतून दीक्षार्थी मुमुक्षु कु.अंजली जैन यांची भव्य अशी शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पाथर्डी येथील ढोल पथक, मुलींच्या लेझीम पथक यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच सुप्रसिद्ध संगीतकार अनुप जैन यांची प्रस्तुती देखील या शोभायात्रेदरम्यान होती. दिनांक २८ एप्रिल २०२४ रोजी शिवप्रताप मंगल कार्यालय येथे होणाऱ्या जैन भागवती दीक्षा महोत्सवानिमित्त जैन धर्माचे २५ साधु साध्वी माजलगाव नगरीमध्ये आलेले असून यांच्या मार्गदर्शनानुसार माजलगावातील मुख्य रस्त्यावरील संभाजी महाराज चौक ते राजस्थानी मंगल भवन इथपर्यंत दीक्षार्थी कु.अंजली जैन यांची भव्य अशी शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली होती. कु.अंजली जैन यांना गुरु गणेश रथामध्ये बसवून माजलगावकरांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. यावेळी महिलांनी कळस घेऊन शोभायात्रेत सहभाग नोंदवला तसेच लहान मुले, पुरुष मंडळी, युवक मंडळ यांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती व त्यांनी नाचत - गात आणि घोषणा देत अंजली ला संयम पथावर जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या. शोभायात्रेदरम्यान विविध ठिकाणी अंजली जैन यांनी वर्षीदानही केले. तसेच विविध ठिकाणी समाजातील काहींनी शोभायात्रीतील भाविक भक्तांसाठी पाण्याची व थंड पेयाची सोय सुद्धा केली होती. यावेळी कुठलीही वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणार नाही व कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी सर्व पोलीस बांधवांनी घेत मोठ्या प्रमाणात सहकार्य केले. यानंतर राजस्थानी मंगल भवन येथे शोभायात्रा पोहोचल्यानंतर भक्ती बहुमंडळ यांच्याकडून अंजली यांचे जोरदार स्वागत करण्यात आले व गुरु महाराजांच्या मंगलाचरणानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

आज रविवारी दिनांक २८ एप्रिल रोजी माजलगाव येथील शिवप्रताप मंगल कार्यालय मध्ये कु.अंजली जैन यांचा जैन भागवती दीक्षा महोत्सव पार पडणार असून यासाठी समाजातील सर्व लोकांनी कार्यक्रमास हजेरी लावावी व अंजलीला आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन दीक्षा महोत्सव समिती माजलगाव व श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ माजलगाव यांच्याकडून करण्यात आले आहे.

# ब्राह्मण बहुद्देशीय सभेच्या वतीने परळीत आज ४४ वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ एप्रिल**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ब्राह्मण बहुद्देशीय सभा द्वारा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा आयोजित करण्यात आला असुन यंदाचे हे या उपक्रमाचे ४४ वे वर्ष आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभेच्या वतीने करण्यात आले आहे.या सोहळ्याला सर्वस्तरीय मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या शानदार सोहळ्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

ब्राह्मण समाजाची मध्यवर्ती संस्था असलेल्या ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने गेल्या ४३ वर्षापासून अविरतपणे हा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा उपक्रम चालवला जातो.शानदार आयोजन, नियोजनबध्द सोहळा या वैशिष्ट्यामुळे हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे.दर्शन मंडप श्री वैद्यनाथ मंदिर येथे आज सोमवार, दिनांक २९ एप्रिल रोजी सकाळी ११:१२ मी. वाजता सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा संपन्न होणार आहे. ब्रह्मविभूषण भागवतमर्मज्ञ ह.भ.प.बाळुमहाराज उखळीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व वे.शा.सं. मनोहरदेव जोशी यांच्या व समस्त ब्रह्मवृंद क्षेत्रपाध्यायांच्या वैदिक अधीपत्याखाली हा व्रतबंध सोहळा संपन्न होणार आहे.या सोहळ्यासाठी ब्राह्मण बहुद्देशीय सभेच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. या सोहळयात विविध ठिकाणच्या २१ बटुंवर उपनयन संस्कार करण्यात येणार आहेत.

तरी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभा, स्वा.वी.दा. सावरकर प्रबोधिनी, पेशवा युवा संघटन,ब्राह्मण महिला आघाडी,ब्राह्मण युवक संघटना, पुरोहित संघटना आदींनी केले आहे.

या बटुंवर होणार उपनयन संस्कार

१. चि. सर्वेश सचिन येवतेकर, परळी वैजनाथ.२. चि. चिन्मय धनंजय नाईक, परळी वैजनाथ.३. चि. आरव कल्पेश पाथ्रीकर, परळी वैजनाथ.४. चि. रिशांक श्रीपाद पांडे, परळी वैजनाथ.५. चि. चैतन्य नलेश कुलकर्णी, गिरवली.६. चि. तन्मय गणेश वकिल, लातूर.७. चि. तुषार गणेश वकिल, लातूर.८. चि. प्रतिक प्रकाशराव पाटील, गंगाखेड.९. चि. श्रेयश शशिकांतराव बोरगांवकर, पूणे.१०. चि. श्रीनिवास मुरलीधर कुलकर्णी, पूणे.११. चि. श्रेयस रमाकांत कुलकर्णी, खपाट पिंपरी.१२. चि. समर्थ श्रीराम पांडे, माजलगांव.१३. चि. समर्थ श्रीकांत कुलकर्णी, उजनी.१४. चि. साहिल भास्करराव टेकाळे, छ. संभाजीनगर.१५. चि. अवधुत कृष्णा कुलकर्णी, परभणी.१६. चि. दुर्गेश दत्तात्रय कुलकर्णी, परभणी१७. चि. आर्यन संतोष वडगांवकर, पट्टीवडगांव.१८. चि. शौनक शैलेश माळवटकर, वसमत.१९. चि. अजिंक्य गोविंदराव जोशी, हाडोळती, ता. अहमदपूर.२०. चि. समर्थ विवेकराव पांडे, नांदेड.२१. चि. सात्विक संदिप कुलकर्णी, तेलंगणा.

# बजरंग सोनवणेंच्या विजयासाठी मानाच्या गाड्या ओढून सिध्देश्वर हिंगेंचा नवस

## बजरंग बाप्पा, बदामराव पंडितांनी केला हिंगेंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२८ एप्रिल**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे लोकसभा निवडणुकीत विक्रमी मतांनी निवडून यावेत म्हणून गेवराई तालुक्यातील रानमळा या छोट्याशा गावातील सिध्देश्वर हिंगे यांनी हनुमान जयंतीला भाविकांनी खचाखच भरलेल्या मानाच्या १२ बैलगाड्या ओढून हनुमानजींना नवस केला आहे. त्यांचा उमेदवार बजरंग सोनवणे व माजीमंत्री बदामराव पंडित यांनी गावी जाऊन सत्कार केला.



गेवराई तालुक्यातील रानमळा या छोट्याशा गावातील मराठा आंदोलन मराठा आरक्षणासाठी चळवळीत सहभागी असलेले सिद्धेश्वर हिंगे यांनी मराठा आरक्षणाचे समर्थक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे प्रचंड मताने निवडून यावेत म्हणून हनुमान जयंतीच्या दिवशी भाविकांनी खचाखच भरलेल्या मानाच्या १२ बैलगाड्या ओढून हनुमानजींना नवस केला आहे. याची माहिती गेवराई तालुक्याचे शिवसेनेचे नेते माजी मंत्री बदामराव आबा पंडित यांनी देताच उमेदवार बजरंग सोनवणे यांनी बदामराव आबा पंडित, पूजाताई मोरे, पंढरीनाथ लगड, युध्दजित पंडित, महेश बेदरे, अमोल करांडे, आबा दाभाडे, उद्योजक पानसंबळ यांच्यासह रानमळा येथे जावून सिद्धेश्वर हिंगे यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.

बजरंग बाप्पांना गेवराई तालुका लीड देणार

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी गेवराई तालुक्यात अनेक गावांना भेटी देऊन मतदारांशी संवाद साधत प्रचाराची पहिली फेरी पूर्ण केली. गावा - गावातून उस्फुर्त स्वागत आणि मतदारांकडून मिळत असलेल्या प्रतिसादावरून गेवराई तालुक्यातून बजरंग सोनवणे यांना मताची लीड मिळणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# पुनर्वसनाच्या सुविधांपासुन वंचित ठेवणाऱ्यांवर कारवाई करा

## नेते निवडणुकीत गुंग, नागझरीचे पुनर्वसन अकडलेलेच

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ एप्रिल**

नागझरी गायमुख या कुंडलिका प्रकल्पातील पुनर्वसित गावाला व प्रकल्पग्रस्तांना १९८६ ते अद्यापपर्यंत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व मनमानीपणामुळे लाभापासून व गावाच्या अस्तित्वापासून वंचित ठेवणा-या प्रशासनावर कारवाई करून, तातडीने पुनर्वसनाचे लाभ द्यावेत अशी मागणी विभागीय आयुक्त कार्यालय प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नागझरी गायमुख मुळ १९८६ पुर्वीचा ता. केज व पुनर्वसित १९८६ नंतरचा ता. माजलगाव जि. बीड या गावाला १९८६ ते अद्यापही प्रशासनास न्याय मागुणही न्याय मिळत नसल्याने या गावावर अन्याय झाला. सदर प्रकरणात सातत्याने न्याय मागुणही न्याय मिळत नसल्याने नागझरी गायमुख या कुंडलिका प्रकल्पात संपादित होउन पुनर्वसन झाल्यानंतर गावाच्या अस्तित्वाचा तसेच प्रकल्पग्रस्त व नागरिकांच्या मुलभुत न्याय मागण्यांची प्रशासनाकडुन दखल न घेतल्याने सन १९८६ ते आजपर्यंत पुनर्वसनाच्या लाभांपासुन व गावाच्या अस्तित्वापासून वंचित ठेवल्याने विवीध अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामध्ये नागझरी गायमुख हे गांव आहे का ? नाही ? तसेच ऑनलाईन कुठलेही कागदपत्रे निघत नाहीत त्यामुळे ग्रामस्थांना विवीध समस्यांचा सामना करावा लागत आहे. सध्या देशातील सर्वोच्च लोकसभेची निवडणुक सुरू असुन नेते निवडणुकीत गुंग आहेत तर नागझरी गायमुख या गावाचे पुनर्वसन अद्यापही अडकेलेले आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना १९८६ ते अद्यापपर्यंत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व मनमानीपणामुळे लाभापासून व गावाच्या अस्तित्वापासून वंचित ठेवणा-या प्रशासनावर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थ बाबाराव मुरकुटे यांचेसह नागझरी गायमुख ग्रामस्थांनी केली आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शिंदे गट शिवसेना, उबाठा शिवसेनेकडून विजयाचे दावे

## कार्यकर्ते आणि समर्थकांना ४ जूनच्या निकालाची प्रतिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**

हिंगोली लोकसभा मतदार संघात शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत ६३.५४ टक्के मतदारांनी मतदान झाले. मतदानानंतर आता शिंदे गट शिवसेना आणि उबाठा शिवसेना विजयाचे दावे करीत आहेत. तर वंचीतकडूनही आमचाच विजय होणार असल्याचा दावा केल्या जात आहे. कार्यकर्ते आणि समर्थक मात्र ४ जूनच्या दिवशी येणाऱ्या निकालाची आतुरतेने वाट पहात आहेत.

हिंगोली लोकसभा मतदारसंघात दि २६ एप्रील रोजी मतदान पार पडले. शिंदे गटाचे बाबुराव कदम कोहळीकर, उबाठा शिवसेनेचे नागेश पाटील आष्टीकर आणि वंचीत बहुजन आघाडीचे डॉ बी डी चव्हाण यांच्यात तिरंगी लढत झाली आहे. तीनही उमेदवाराचे भवितव्य आता मतपेटीत कैद झाले असून येत्या ४ जूनला मतदानाचा निकाल लागणार आहे.

निवडणुकीचा प्रचार हिंगोली लोकसभा मतदारसंघात शिगेला पोहोचला होता. शिंदे गटाचे शिवसेनेचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, उद्योग मंत्री उदय सामंत, संपर्क प्रमुख आनंदराव जाधव यांच्यासह भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, आ. संतोष बांगर, लोकसभा प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी खा शिंवाजीराव माने, आ राजु नवघरे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बी डी बांगर यांनी निवडणुक प्रचारात सहभाग घेत मतदारांना बाबुराव कदम यांना मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मत, विकासाला मत असा झंझावती प्रचार केला. विकासाच्या मुद्यावर महायुतीने मते मागितली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान करून विकसीत भारताचे स्वप्न साकार करण्याचे आवाहन यावेळी नेत्यांनी केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हदगाव आणि वसमत येथील सभेत माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि आदीत्य ठाकरे यांच्यावर सडकून टीका करीत बाप नंबरी तो बेटा दस नंबरी असा टोला लगावला.


उबाठा शिवसेनेचे उमेदवार नागेश पाटील आष्टीकर यांच्या प्रचारार्थ माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्यासह संपर्क प्रमुख बबनराव थोरात, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी मंत्री डॉ जयप्रकाश मुंदडा, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, लोकसभा प्रभारी विनायक भिसे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, काँग्रेसेचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, आ. डॉ प्रज्ञा सातव, माजी आ. डॉ संतोष टारफे महाविकास आघाडीचे नेते यांनी प्रचारात उडी घेत सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. शेतीमालाला भाव, महागाई, बेरोजगारी आणि पक्षातील गद्दारी या मुद्यावर मते मागितली.

वंचीत बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ बी डी चव्हाण यांच्या प्रचारार्थ वंचीतचे संस्थापक अध्यक्ष ॲड प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर सभा घेत पंतप्रधान मोदी आणि काँग्रेससह उबाठा शिवसेनेवर जोरदार टीका केली. दरम्यान, दोन्ही शिवसेना आणि वंचीतच्या उमेदवारांनी घरोघरी जाऊन प्रचार केला. कॉर्नर बैठका, संवाद साधत मते मागितली.

मतदानानंतर आता गावागावात आणि शहरातील चौकाचौकात विजयाचे आडाखे बांधल्या जात आहेत. जातीनिहाय मतदानाचे विश्लेषण, मराठा आरक्षणाच्या मुद्दयावरून मराठा समाजाचा कोणत्या पक्षाकडे कल होता. ओबीसीचे मतदान कोणाला मिळाले, अल्पसंख्यांक मततदार कोणाच्या बाजूने झुकला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास कामाला कोणी मतदान केले. यावरून चर्चेला सुरूवात झाली असून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये आता विजयाचे दावे-प्रतिदावे करण्यात येत आहेत. हिंगोली लोकसभा मतदारसंघात शिंदे शिवसेना विरूध्द उध्दव ठाकरे यांची शिवसेना यांच्यातच खरी लढत झाली असून वंचीतचे डॉ बी डी चव्हाण यांच्या मतविभाजनाचा फायदा दोन्ही पक्षांपैकी कोणाला होणार हे आता निकालाच्या दिवशी स्पष्ट होणार आहे. परंतु बाबुराव कदम कोहळीकर आणि नागेश पाटील आष्टीकर यांच्यातच काट्याची टक्कर झाली असल्याचे दिसत आहे.

# १०० टिप्पर गाळ नेल्यास ३७ हजारांचा निधी मिळणार

## भाजप आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची माहीती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**

येथील जलेश्वर तलावातील गाळ शेतात नेऊन टाकण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्याने १०० टीप्पर गाळ उपसा करून शेतात टाकल्यास किंवा एक हेक्टर शेतात टाकल्यास त्याना ३७ हजारांचा निधी मिळणार असल्याची माहीती भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली आहे.

शहरातील प्राचीन जलेश्वर तलावाचे सौंदर्यीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या अथक परिश्रमानंतर चार पदरी रस्ता तसेच अतिक्रमण होऊ नये यासाठी जलेश्वर तलावाभोवती संरक्षण भिंतीचे काम सुरू आहे. शहरातील गवळीपुरा भागात जलेश्वर मंदिराजवळ मोठा तलाव असून या तलावातील पाणी काढण्याचे काम मागील काही दिवसांपासून युध्द पातळीवर सुरू होते. पाणी उपसा झाल्यामुळे आता तलावातील गाळ उपसा करण्यसाठी प्रशासनाकडून प्रयत्न केल्या जात आहे. गाळ उपसा झाल्यास पाणीपातळीत वाढ होणार असून या तलावातील पाण्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. त्यामुळे या तलावातील गाळ उपसा करण्यासाठी प्रशासनाने जेसीबी लावले असून जेसीबीद्वारे मोफत गाळ उपसा करून देण्यात येणार आहे.

दरम्यान, भाजपचे आ. तान्हजीराव मुटकुळे यांनी जलेश्वर तलावाच्या सौंदर्यीकरणासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडे पाठपुरावा केल्यामुळे या तलावाचे सौंदर्यीकरणाचे काम सुरू झाले आहे. आता गाळ उपसा करण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या टिप्परद्वारे गाळ नेऊन शेतात टाकल्यास शेत जमीन सुपीक होण्यास मदत होणार असून ज्या शेतकऱ्याने १०० टिप्पर गाळ शेतात नेऊन टाकल्यास किंवा १ हेक्टर क्षेत्रात गाळ टाकल्यास त्यास ३७ हजाराचा निधी देखील देण्यात येणार असल्याची माहीती भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली आहे. या गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत हा निधी दिला असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आ. मुटकुळे यांनी केले आहे.

# हिंगोलीत मतदान केंद्रावरील पथकांचे पुष्पवृष्टीने स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**

१५- हिंगोली सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने ९४- हिंगोली विधानसभा मतदार संघातंर्गत एकुण ३४३ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले होते. दि.२६ एप्रिल रोजी नेमुण दिलेल्या मतदान केंद्रावरील मतदानाचे सर्व कामकाज यशस्वीरित्या पार पाडल्यानंतर हिंगोली शहरातील लिंबाळा येथील शासकीय तंत्रनिकेतन येथे स्ट्राँग रुममध्ये सर्व बलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट व ईतर निवडणूक साहित्य जमा करण्यासाठी मतदान केंद्रावरील पथके परत आले असता लोकशाहीच्या या उत्सवामध्ये महत्वपुर्ण भुमिका बजावल्याबद्दल सदर मतदान केंद्रावरिल पथकांचे कौतुक करुन पुष्पवृष्टी करुन बँडद्वारे देशभक्तीपर संगीत वाजवुन वाजत-गाजत स्वागत करण्यात आले. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी उमाकांत पारधी, अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नवनाथ वगवाड, अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सखाराम मांडवगडे, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, अपर तहसिलदार हिमालय घोरपडे, सावित्री भुरे तसेच ईतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



**हिंगोली- नांदेडहून अमरावतीकडे आंब्याची वाहतुक करणारा पिकअप सकाळी कनेरगाव नाका शिवारात चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे पलटी झाला. या अपघातात चालक किरकोळ जखमी झाला असून आंब्याचे मात्र नुकसान झाले आहे. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पोलिसांची ३३ वाहन चालकांवर कार्यवाही

हिंगोली- जिल्ह्यात अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर विविध पोलिस ठाण्यांतर्गत पोलिस विभागाने कार्यवाही केली. ३३ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही करीत त्यांचेकडून २० हजार ९५० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच दि २७ एप्रील रोजी पोलिसांच्या पथकाने दारूबंदी कायद्याअंतर्गत एका ठिकाणी छापा मारून ४ हजार २०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करीत आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### चिंतामणी गणपतीच्या देणगीची मोजणी



हिंगोली- येथील नवसाला पावणारा विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीला संकष्ट चतुर्थीनिमित्त मोठ्या संख्येने भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी भाविकांनी चिंतामणी गणपतीला देणगी स्वरूपात रोख रक्कम तसेच दागिने दान दिले. या रकमेची मोजणी चिंतामणी संस्थानच्यावतीने पदाधिकारी आणि विश्वस्तांच्या उपस्थितीत करण्यात आली.

# उन्हापासून बचावासाठी टोपी, रूमालांची खरेदी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**

जिल्ह्यात सध्या तापमान ४० अशांच्यावर गेल्यामुळे कडक उन्हाच्या झळांना सामोरे जावे लागत आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी बाजारातील दुकानांवर नागरिक टोपी, रूमाल खरेदी करण्यासाठी गर्दी करीत असतांना दिसत आहे.

मागील तीन दिवसांपासून जिल्ह्यात उन्हाचा पारा चांगलाच वाढला आहे. त्यामुळे उष्णतेची लाट आली आहे. शहरातील रस्त्यांवर दुपारी शुकशुकाट पसरला असून दुपारच्यावेळी लोक घराबाहेर पडण्यास धजत नाहीत. उन्हापासून बचाव करण्यासाठी बाजारात विविध साहीत्य विक्रीसाठी आले असून टोपी आणि रूमाल खरेदीला नागरिक जास्त प्राधान्य देत आहेत. तर थंडपेयाच्या दुकानातही चांगलीच गर्दी होत असल्याचे दिसत आहे.

# म्हसोबा यात्रा मंगळवारपासून प्रारंभ



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२७, सिल्लोडचे आराध्यदैवत श्री. म्हसोबा महाराज यांचा यात्रा महोत्सवास मंगळवार ( दि.३० ) पासून सुरुवात होत आहे. त्याअनुषंगाने नगर परिषद प्रशासन तसेच यात्रा उत्सव समितीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. यात्रा अवघ्या दोन दिवसांवर येवून ठेवल्याने आतापासूनच श्री म्हसोबा महाराज मंदिर परिसरात रहाट पाळणे, प्रसाद व विविध दुकाने तसेच भाविकांची वर्दळ दिसून येत आहे.

यात्रा उत्सवाच्या अनुषंगाने श्री म्हसोबा महाराज मंदिरात नुकतीच आढावा बैठक पार पाडली. यावेळी पोलीस निरीक्षक शेषराव उदार, नायब तहसीलदार प्रभाकर गवळी, मुख्याधिकारी सुनील गोराडे, उत्सव समितीचे अध्यक्ष राजेंद्र बन्सोड, स्वागताध्यक्ष अब्दुल समीर, सचिव नंदकिशोर सहारे, प्रताप प्रशाद , बाबुराव वाकडे, सुनील प्रशाद, संतोष ठाकूर , अशोक बन्सोड,मंजितराव भाग्यवंत, दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बन्सोड आदी पदाधिकारी सदस्य व गावकरी यावेळी उपस्थित होते.

श्री. म्हसोबा महाराज यात्रा उत्सव समितीच्या माध्यमातून यात्रेच्या अनुषंगाने भाविकांना सोयीसुविधा निर्माण करण्यासह मंदीर परिसरात विद्युत रोषणाई , स्वच्छता, सुशोभीकरण, वाहतूक व्यवस्था आदी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. नवसपूर्ती साठी भाविकांना पिण्याचे पाणी, शेंदूर टोप मिरवणूक मार्गाची स्वच्छता आदी कामे पूर्ण झाली आहेत.

असा असणार यात्रा उत्सव

दि. ३० एप्रिल मंगळवारी सकाळी ९ वाजता शेंदूर, टोप व ध्वज मिरवणुकीने यात्रेला सुरुवात होईल. त्यानंतर शोभा यात्रा मंदिरात आल्यानंतर विधिवत अभिषेक होईल. दुपारी ३ वाजता बारागाडे, दुपारी ५ वाजता तगतराव तर रात्री ८ वाजता फटाक्यांची आतषबाजी, त्यानंतर रात्री दशावतारी सोंगे कार्यक्रम होईल. दुसऱ्यादिवशी दि. १ मे बुधवार रोजी पहाटे ४ वाजता श्री म्हसोबा महाराजांचा स्वारीचा कार्यक्रम होईल. तर दिवसभर मंदिरात हजऱ्यांचा कार्यक्रम होणार आहे.

# महाराष्ट्रदिनी माझी लोकशाही-माझा फळा फलकलेखन स्पर्धेचे आयोजन

### शाळांबरोबरच सार्वजनिक फलकांवर होणार मतदार जनजागृती

अहमदनगर, दि. २८ : जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार अहमदनगर-शिर्डी लोकसभा मतदारसंघातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी, बाळासाहेब कोळेकर यांच्या संकल्पनेतून १ मे-महाराष्ट्रदिनी शाळांमध्ये शैक्षणिक निकाल घेण्यासाठी आलेल्या पालकांमध्ये मतदार जनजागृती व्हावी म्हणून अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने शिक्षक, कलाशिक्षक व कलाकारांसाठी माझी लोकशाही-माझा फळा या फलकलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. माझा भारत-माझं मत, १३ मे रोजी मतदान कराच,अहमदनगर-शिर्डीच्या मतदार राजा जागा हो १३ मे रोजी मतदानाचा धागा हो यापैकी एका विषयावर आकर्षक व संकल्पनायुक्त फलकलेखन करावयाचे असून शाळा , शासकीय कार्यालये ,धार्मिक स्थळे,चौकातील फळे,नोटीस-सूचनाफलक आदी फलकांचा वापर करता येईल.आकर्षक रंगसंगतीच्या फलकलेखनाबरोबरच फलक आरेखन व सजावट देखील स्पर्धक करू शकतात तसेच मतदानाची १३ मे २०२४ ही तारीख व स्वतःचे नाव फलकावर येणे आवश्यक आहे.प्रत्येक तालुक्यातून प्राथमिक व माध्यमिक विभाग मिळून सहा क्रमांकासह एकूण ४५ विजेते घोषित केले जाणार आहेत.शक्य झाल्यास नागरिक, ग्रामस्थ, पालक-शिक्षक यांच्याबरोबर फलकासह फोटो घेऊन आपापल्या सोशल मीडियावर sveepahmednagar या हॅशटॅगसह अपलोड देखील करावेत.एका स्पर्धकास अनेक फलकलेखन करता येतील.

# आंबेडकरी नेते मुर्दाड झाले आहेते : महालिंगे

## बुद्धप्रिय कबीर यांच्यावरील दीर्घकाव्य, 'कॉम्रेड जयभीम' चे थाटात लोकार्पण



छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी - एकीकडे देशात थैमान घातले जात आहे. लोकशाही, प्रजासत्ताक, संविधान, संसदीय प्रणाली आणि स्वायतत्तेला बाधा पोहचवली जात आहे. तर दुसरीकडे आंबेडकरी विचारांचे नेते त्यांच्याच मांडीला मांडी लावून बसले आहेत. जिवंत असलेल्यांनाही आपण जिवंत म्हणून शकत नाही. ते मुर्दाड आहेत. अशी खंत ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. दिलीप महालिंगे यांनी व्यक्त केली. दिवंगत सामाजिक कार्यकर्ते बुद्धप्रिय कबीर यांच्यावरील 'कॉम्रेड जयभीम' या दीर्घकाव्याचा रविवारी, २१ एप्रिल रोजी लोकार्पण सोहळ्यात महालिंगे बोलत होते. मुंबई विद्यापीठाच्या प्राध्यापक तथा ज्येष्ठ कवयित्री डॉ. श्यामल गरूड यांनी हे दीर्घकाव्य लिहिले आहे. पुस्तकाचे लोकार्पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ पत्रकार मंगल खिंवसरा, स्वराज अभियानचे सुभाष लोमटे, माजी नगरसेवक गौतम खरात, गौतम लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्रा. राम बाहेती होते.बुद्धप्रिय यांच्यावर आधारित दीर्घकाव्यावर भाष्य करताना प्रा. महालिंगे म्हणाले, जेव्हा आमची मने गरम होती, तेव्हा आमच्या घरातील चुली थंड होत्या. आता चुली गरम आहेत, तर आमची मने थंड झाली आहेत. देशाचे स्वातंत्र्य आपण टिकवू शकू की नाही, अशी सध्याची स्थिती आहे. लढवय्या कार्यकर्त्यांची गरज असताना ते शिल्लक राहिलेले नाहीत. डॉ. गरूड यांनी कवितेतून मांडलेली व्यथा चळवळीचे वर्तमान सांगणारी आहे.

महागाईची झळ कष्टकऱ्यांना

खिंवसरा म्हणाल्या, महागाईचे चटके मध्यमवर्गाला बसत नाहीत. पण कष्ट करणाऱ्यांना महागाईची झळ बसते. कार्यकर्त्यांनी चळवळीसाठी झोकून द्यावे. मात्र, स्वत:च्या आरोग्याचीही काळजी घेतली पाहिजे. लोमटे म्हणाले, लोकांनी आता एकत्र येणे गरजेचे आहे. अध्यक्षीय समारोप करताना प्रा. बाहेती म्हणाले, जात-धर्म, पक्षाच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची वेळ आली आहे. आजचे आवाहन पेलण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे.

कार्यकर्त्यांची वानवा

डॉ. सरवदे म्हणाले, जातींचा अंत होण्याऐवजी जाती आणखी बळकट होताना आपल्याला दिसत आहे. प्रत्येक जण जातींना घट्ट आवळून बसला आहे. मग बाबासाहेबांना अभिप्रेत जातीविरहित समाजरचनेचे स्वप्न कधी साकार होईल का..? याविषयी माझ्या मनात शंका निर्माण झाली आहे. डॉ. गरूड यांनी दीर्घकाव्याची भूमिका मांडली. भीमराव सरवदे, के. ई. हरदास, अशोक गायकवाड यांची यावेळी उपस्थिती होती. मुकूल निकाळजे यांनी सूत्रसंचालन केले. कवी सुनील उबाळे यांनी आभार मानले.





# लोह्यातील कापसाच्या दुकानाला आग

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, २८ एप्रिल -**

शहरातील स्मशानभूमी व श्रीनिवास मंगल कार्यालय जवळील कापसाच्या दुकानात शॉट सर्किटमुळे आग लागून अनेक दुकानाचे नुकसान झाले.

श्रीनिवास मंगल कार्यालयशेजारी शेडचे दुकान तयार करुन अनेक व्यापाऱ्याला दिले आहे. त्यामध्ये स्टाईल फरशी, मेकानिक, कलर, कापुस खरेदी, डिझायनर असे अनेक व्यापारी लाईन तयार होऊन शेटे नावाने दुकानाची लाईन म्हणुन ओळख निर्माण केली आहे. याच दुकान लाईन मधील कापसाच्या दुकानात शॉट सर्किटमुळे आग लागली. थोड्याच वेळात आगीने रूद्ररुप धारण केले. अति उन्हाच्या तडाख्यात परिसरातील नागरिक व दुकानदार आगीला बघून सैरावैरा पळु लागले. कापसाला लागलेल्या आगीमुळे परिसरात दूरच धुर पसरला जिकडे तिकडे काळोख पसरला अनेकांना श्वास घेण्यास त्रास सुरू झाला. धुरामुळे परिसर दिसेनासा झाला. आग आटोक्यात आणण्यासाठी नागरिक हैराण होऊन आग विझविण्याचा प्रयत्न करत होते, पण आग अति उन्हाच्या तडाख्याने आग भडकत होती. यामध्ये अनेक दूकानाचे नुकसान झाले. आग आटोक्यात आणण्यासाठी, न.पा. आग्नीशमक दलासह, अनेकांनी स्वतः टॉंकरने पाणी आणुन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. या आगीमुळे अनेकांच्या दुकानाचे नुकसान होण्याचे संकेत दिसत आसल्याने शरद पाटील पवार, चंद्रकांत आडगावकर, सुधाकर पाटील पवार, पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी, एम. एस. ई. बी.चे. कर्मचारी, नागरिक व युवकांनी जिव धोक्यात टाकुन आगीवर ताबा मिळवला. यामुळे मोठी हानी टळली.

घटनास्थळी तहसिलदार विठ्ठल परळीकर, पोलिस निरीक्षक ओंमाकांत चिंचोलकर, सहाय्य पोलिस निरीक्षक रोडे, केंद्रे, सुभाष नवले यांनी तात्काळ भेट देऊन आग आटोक्यात आणण्यासाठी यंत्रणा सक्रीय ठेवली.

# ॲड. बाळासाहेब आंबेडकरांच्या वक्तव्याचे स्वागत : सुनिल सोनूले

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, २८ एप्रिल -**

आगामी सप्टेंबर,ऑक्टोबर मध्ये होणाऱ्या राज्यातील विधानसभा निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडी आणि कॉंग्रेस एकत्र लढू शकतात असा विश्वास वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी मुंबईत शनिवारी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला. ही आनंदाची बातमी असून असे झाल्यास आ. बाळासाहेबांच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करु असे मत महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सदस्य सुनिल सोनूले यांनी बोलताना व्यक्त केले.



वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे आमचे वंदनीय आहेत त्यांचा आम्ही नेहमी आदर करु, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीने समविचारी पक्षाशी युती करायला हवी होती. लोकसभा निवडणूक प्रचारा दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चारशे पार चा नारा दिला यामुळे सर्व निळा जनसागर हवालदिल झाला आहे. संविधान व लोकशाही वाचवायची असेल तर कॉंग्रेस-वंचित बहुजन आघाडी युती आवश्यकच आहे.वेळेप्रसंगी आगामी विधानसभा निवडणुकीत थोडी कमी जास्त तडजोड करून का होईना वंचित बहुजन आघाडीने कॉंग्रेस सोबत युती करावी असे झाल्यास आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये कॉंग्रेस-वंचित बहुजन आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# इंजि. शिवाजीराजे बाभळीकर यांचे आज व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २८ एप्रिल -**

नीट २०२४ बॅचच्या निरोप समारंभाच्या निमित्ताने मंगळवार, ३० एप्रिल रोजी संध्याकाळी ४ वाजता कल्पतरू सायन्स अकादमीच्या सभागृहात मातोश्री प्रतिष्ठान ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे उपसंचालक इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या सायंटिफिक व प्रॅक्टिकल व्याख्यानाचा लाभ विद्यार्थी व पालकांनी घ्यावा, असे आवाहन प्रा. डॉ. संदीप निर्मळ शेगावकर व प्रा. डॉ. सुधाकर राठोड अकोलेकर यांनी केले आहे.

# मुलांना उच्च शिक्षण देऊन जीवनात यशस्वी करा : शुभम रेकुलवार



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २८ एप्रिल -**

यूपीएससी २०२३ या परीक्षेत यश प्राप्त केलेले शुभम सत्यनारायण रेकुलवार Air ७९० राहणार मुतनूर तालुका इंद्रवेली जिल्हा आदिलाबाद तेलंगाना यांचा भव्य सत्कार कलाल गौंड तेलंग समाज युवा प्रतिष्ठान नांदेड यांच्या वतीने करण्यात आला.

कलाल समाजातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे व शिक्षणाच्या माध्यमातून उच्च पदे प्राप्त करून समाज व राष्ट्राची सेवा करावी असे आव्हान शुभम रेकुलवार यांनी केले. याप्रसंगी शुभम यांनी स्पर्धा परीक्षेचे तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी याप्रसंगी मार्गदर्शन सुद्धा केले.

याप्रसंगी शुभम चे वडील सत्यनारायण रेकुलवार यांनी आपल्या मुलाला कशा पद्धतीने उच्च शिक्षण देताना अनेक अडचणींना तोंड देऊन प्रसंगी शैक्षणिक कर्ज घेऊन मुलाला शिक्षण दिल्याचे याप्रसंगी आपले अनुभव कथन केले. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी इंग्रजी किंवा आपल्या ग्रामीण परिस्थितीचा न्यूनगंड न बाळगता स्पर्धा परीक्षेमध्ये उतरले पाहिजे ते नक्कीच राष्ट्रीय स्तरावर यशस्वी होतील असे याप्रसंगी माझी उपायुक्त शशी मोहन नंदा यांनी स्पष्ट केले. बहुजन समाज हा जाती जमातीमध्ये विखुरला असला तरी त्यांनी शिक्षण हा केंद्रबिंदू मानून समाजाला शिक्षित करण्यावर मोठ्या प्रमाणात भर द्यावा व परिवर्तनवादी विचारांचा स्वीकार करावा तरच समाजात प्रगती करेल असे याप्रसंगी उत्तम सोनकांबळे माजी सहसंचालक कोषागार यांनी स्पष्ट केले. कलाल समाजातील होतकरू गरीब विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या मार्गदर्शनासाठी आंबेडकरवादी मिशन मदत करेल याचा लाभ समाजातील विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आव्हान याप्रसंगी दीपक कदम प्रमुख आंबेडकरवादी मिशन यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना कॉ .उज्वला पडलवार ,रामेश्वर गोडसे,बालाजी गोडसे,कलाल,गौड,तेलंग समाज युवा प्रतिष्ठान ,नांदेड चे संस्थापक अध्यक्ष सुनिल अनंतवार आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आंबेडकरवादी मिशन मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या भव्य सत्कार सोहळ्यास कलाल गौंड तेलंग समाजातील अनेक मान्यवर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात प्रामुख्याने माजी उप आयुक्त शशी मोहन नंदा, माजी सहसंचालक कोषागार उत्तम सोनकांबळे, व्यंकटेश पाटील, बँक मॅनेजर निखिलेश रेकुलवार, निलेश रेकुलवार, बालाजी सुंदरगिरवार, अशोक पडलवार, गंगाधर नंदेवाड, रामेश्वर गोडसे, बालाजी गोडसे, सुमित गोडसे अनिल पडलवार, लक्ष्मीकांत सुंदरगिरवार, उल्हास सुदेगुणेवार, भारत कन्नलवार, विजय खुणेवाड, सुधीर भुरेवार, आनंद निळकंठवार, दिलीप चंदनवार, बालाजी अनंतवार, गणेश नंदेवार, नागनाथ कुच्वेवार, शंकर रायपलवार, महेश निळकंठवार, उज्वला पडलवार, प्रियंका अनंतवार, पूजा नातेवार, आरती नंदेवार, अंजली अनंतवार, ज्ञानेश्वर ईबीतवार, बुधाजी नातेवाड आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. बाबाराव नंदेवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आंबेडकरवादी मिशन मधील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला.

# चोरंबा गट ग्रामपंचायत गावांचा निवडणूकीवर बहिष्कार

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, २८ एप्रिल -**

तालुक्यातील चोरंबा (ना) गट ग्रामपंचायत गावे सायलवाडी, देशमुख वाडी,खंडेश्वर वाडा, पहिल्यांदा हदगाव तालुक्याशी असलेल्या चोरंबा ना.गट ग्रामपंचायतीतील सायलवाडी, देशमुखवाडी, खंडेश्वर नगर तांडा वस्ती या चार छोट्या छोट्या गावांनी हिंगोली लोकसभा निवडणुकीमध्ये बहिष्कार टाकला असून एक सुद्धा मतदान त्या ठिकाणी झाले नाही आलेले सर्व कर्मचारी बिना मतदानाचे परत गेले आहे. सदरील या गावांचा कारभार हदगांव - अर्धापूर दोन तालुक्याशी आहे. सध्या महसूल अर्धापूर व पंचायत हदगांव तालुक्याशी आहे. त्यांना गावात ये जा करण्यासाठी रस्ता नसल्याने अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. सोयीसुविधेपासुन वंचित असल्याने हक्काच्या मागणीसाठी गावक-याकडुन हदगांव सह नव्याने झालेल्या अर्धापूर तालुका नांदेड जिल्हा प्रशासन दरबारी अनेक वेळा पाठपुरावा केला .परंतु अद्याप दखल घेतली नसल्याने त्यांनी निवडणूकीच्या अगोदरच आपल्या मागणीच्या निवेदनातून आमच्या मागणीकडे लक्ष द्या अन्यथा येणा-या निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला होता.

परंतु अद्याप याविषयावर लोकप्रतीनीधीसह प्रशासनाकडून दखल घेतली नसल्याने रोष व्यक्त करीत अखेर ग्रामस्थांनी लोकसभा निवडणूकीवर बहिष्कार टाकला. मतदान केंद्राकडे पाठ फिरवली असल्याने प्रशासनाकडून हदगांव तहसीलदार विनोद गुंडमवार, गटविकास अधिकारी कैलास बळवंत, माहुर पोलीस उपविभागीय अधिकारी शिंगारे, अर्धापूर नायब तहसीलदार सुनील माचेवाड, मनाठा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमाकांत पुणे यांनी येथील सरपंच गिरजाराव नरोटे यांच्यासह प्रतिष्ठित नागरिकासोबत मतदान केंद्रासह गाव गाठून चर्चा करून मतदान करण्याविषयी शर्तीचे प्रयत्न केले. परंतु प्रशासनाचे प्रयत्न अखेर असफल ठरले आहेत. आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास येणाऱ्याही निवडणूकीवर बहिष्कार टाकणार



असल्याचे सांगत असून संबधित विभागासह प्रशासनाने दखल घेण्याची गरज आहे.

# राष्ट्रवादीसह शिवसेनेच्या निवडणूक जाहिरनाम्यात ज्येष्ठ नागरिकांचा उल्लेख नाही : डॉ. हंसराज वैद्य

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २८ एप्रिल -**

शिवसेना (उद्धव ठाकरे गट) पक्षाचा निवडणूक जाहिरनामा २५ एप्रिल तर राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाचा निवडणूक जाहिरनामा दि २६ एप्रिल रोजी प्रसिद्ध केला गेला आहे. परंतु या जाहिरनाम्यात ज्येष्ठ नागरिकांचा उल्लेख भेटत नसल्याची प्रतिक्रिया डॉ. हंसराज वैद्य यांनी दिली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार)चे सर्वेसर्वा जाणते राजे शारदचंद्र पवार यांच्या वतिने प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरनाम्यात ज्येष्ठ नागरिकांच्या न्याय मागण्यां बद्धलचा उल्लेख महाराष्ट्रातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना अपेक्षित होता. शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या निवडणूक जाहिरनाम्यात भाव वाढीचा, शेतकऱ्यांच्या हमी भावाचा,मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्या बद्दलचा आदी तर राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या जाहिरनाम्यात जातिनिहाय जनगणना, महिला आरक्षण,महागाई नियंत्रण, नवरोजगार निर्मिती, जीएसटी माफीअदि बाबींचाच प्रामुख्याने उल्लेख केलेला आहे. परंतु ज्येष्ठ नागरिकांना स्थान न दिल्याने महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिक नाराज झाले असल्याचे डॉ. वैद्य म्हणाले.

# येरगी येथे डाक कार्यालय मंजूर; सरपंच संतोष पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, २८ एप्रिल -**

तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथे डाक कार्यालय (पोस्ट ऑफिस) मंजूर झाले असून काही दिवसात पोस्ट ऑफिस चालू करावे असे पत्र नांदेड येथील डाक कार्यालयास प्राप्त झाले आहे.



येरगीचे सरपंच तथा भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संतोष पाटील यांनी येरगी येथे डाक कार्यालय सुरू करण्यासाठी अनेकवेळा पत्र पाठवले त्यास खासदार प्रताप पा. चिखलीकर यांनी सुद्धा यासाठी प्रयत्न केले. दि. १० एप्रिल रोजी पोस्ट मास्टर जनरल मुंबई कडून विभागीय डाक घर औरंगाबाद कार्यालयास येरगी येथे नवीन डाक कार्यालय सुरू करण्यासाठी पत्र पाठवले आणि नवीन कार्यालयासाठी दहा हजार रुपये मंजूर करून या संदर्भात दि. १७ एप्रिल रोजी विभागीय डाक कार्यालय औरंगाबाद कडून नांदेड येथील मुख्य डाक कार्यालयास येरगी येथे नवीन डाक कार्यालय सुरू करण्यासाठी अधिकृत पत्र पाठवले. या संदर्भाने येत्या काही दिवसात डाक कार्यालय सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. येरगी गावात नवीन पोस्ट ऑफिस होणार म्हणून गावकरी व परिसरातील नागरिक आनंदित आहेत. युवा सरपंच संतोष पाटील यांच्या प्रयत्नाने गावात अनेक विकासाची कामे करण्यात आली असून नवीन पोस्ट ऑफिस सुरू होणार असल्याने गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून पोस्ट ऑफिस च्या विविध कामांसाठी आता कोणालाही बाहेरगावी जाण्याची गरज भासणार नाही. तसेच विविध बचत, पत्र व्यवहार आदी कामे गावातूनच करता येणार असल्याने सर्वांनी सरपंच संतोष पाटील यांचे अभिनंदन केले आहे.

# उमेदवारांचे भवितव्य मतयंत्रात बंद; निरीक्षकांच्या उपस्थितीत सर्व पेटया स्ट्रॉंग रूममध्ये

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २८ एप्रिल -**

लोकसभा निवडणुकीसाठी काल २६ एप्रिल रोजी मतदान झाल्यानंतर सकाळपर्यंत १६-नांदेड लोकसभा मतदारसंघातील सहाही विधानसभा क्षेत्रातील मतयंत्र नांदेड येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात स्ट्रॉंगरूममध्ये पोहचले आहेत. निवडणूक निरीक्षक, जिल्हाधिकारी, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्रॉंग रूम सिलबंद करण्यात आल्या आहेत. लोकसभा निवडणूक यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी समस्त मतदार, शिक्षक, कर्मचारी, प्रतिनिधींचे आभार व्यक्त केले आहेत.

विदर्भातील पाच व मराठवाड्यातील तीन अशा आठ ठिकाणी दुसऱ्या टप्प्यामध्ये काल २६ एप्रिल रोजी मतदान पार पडले. नांदेडमध्ये २३ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक आयोगाकडून आलेल्या आकडेवारीनुसार नांदेडमधील मतदानाची टक्केवारी ६०.९४ टक्के आहे. सर्वाधिक मतदान भोकर विधानसभा क्षेत्रात झाले असून सर्वात कमी मतदान मुखेड विधानसभा क्षेत्रात झाले आहे. ४ जून रोजी नांदेडच्या खासदाराची निवड होणार आहे. नांदेड येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये ही मतमोजणी होणार आहे.

### स्ट्रॉंग रूमला कडक सुरक्षा

शासकीय तंत्रनिकेतन मध्ये ज्या ठिकाणी मतयंत्र ठेवलेली आहेत त्या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त करण्यात आला आहे. या ठिकाणी कोणालाही प्रवेश नाही. तीन स्तरीय सुरक्षा व्यवस्था या ठिकाणी कार्यरत आहे. यामध्ये बाहेरील सुरक्षा व्यवस्था, स्थानिक पोलीस बघतात. मधल्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये राज्य राखीव पोलीस दलाचे कर्मचारी आहेत. तर ज्या ठिकाणी मतपेट्या सीलबंद केल्या आहेत. त्या ठिकाणी केंद्रीय राखीव दलाचे सशस्त्र जवान २४ तास कडा पहारा ठेवून आहेत. ही सुरक्षा व्यवस्था ४ जून पर्यंत राहणार आहे. ३ जूनला मतमोजणीचे मॉक ड्रील होईल.

आज निवडणूक निरीक्षक शशांक मिश्र यांच्या मुख्य उपस्थितीत स्ट्रॉंग रूम सील करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यासाठी शासकीय तंत्रनिकेतन परिसरात जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, अपर जिल्हाधिकारी पी. एस. बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने, सहा विधानसभाक्षेत्राचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### लोकसभा निवडणुकीतील मतदान

काल झालेल्या मतदानानंतर मतदानाची नेमकी टक्केवारी विधानसभाक्षेत्र निहाय पुढीलप्रमाणे आहे.

भोकर विधानसभा क्षेत्र एकूण मतदार २ लक्ष ९४ हजार ४०९ यापैकी १ लक्ष ९२ हजार ४४६ मतदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुष मतदार १ लक्ष ३ हजार ८१२, स्त्री मतदार ८८ हजार ६३३ व तृतीयपंथीयांची संख्या १ आहे. एकूण टक्केवारी ६५.३७ अशी आहे.

नांदेड उत्तर मध्ये एकूण मतदार ३ लक्ष ४६ हजार ८८६ यापैकी २ लक्ष ३ हजार ४२ मतदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुष मतदार १ लक्ष ८ हजार ५९१, स्त्री मतदार ९४ हजार ४४० व तृतीयपंथीयांची संख्या ११ आहे. एकूण टक्केवारी ५८.५३ अशी आहे.

नांदेड दक्षिण मध्ये एकूण मतदार ३ लक्ष ८ हजार ७९० यापैकी १ लक्ष ८६ हजार १५७ मतदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुष मतदार १ लक्ष ३५७, स्त्री मतदार ८५ हजार ७९९ व तृतीयपंथीयांची संख्या १ आहे. एकूण टक्केवारी ६०.२९अशी आहे.

नायगाव मध्ये एकूण मतदार ३ लक्ष १ हजार २९९ यापैकी १ लक्ष ९६ हजार ८१८ मतदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुष मतदार १ लक्ष ५ हजार ७२५ स्त्री मतदार ९१ हजार ९१ व तृतीयपंथीची संख्या २ आहे. एकूण टक्केवारी ६५.३२ अशी आहे.

देगलूर मध्ये एकूण मतदार ३ लक्ष ३ हजार ९४३ यापैकी १ लक्ष ८१ हजार ८०६ मतदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुष मतदार ९७ हजार ४०३, स्त्री मतदार ८४ हजार ३९८ व तृतीयपंथीयांची संख्या ५ आहे. एकूण टक्केवारी ५९.८२अशी आहे.

मुखेड मध्ये एकूण मतदार २ लक्ष ९६ हजार ५१६ यापैकी १ लक्ष ६८ हजार ३०१ मतदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुष मतदार ९० हजार ६००, स्त्री मतदार ७७ हजार ७०१ व तृतीयपंथीयांची संख्या शून्य. एकूण टक्केवारी ५६.७६ अशी आहे.

१६-नांदेड लोकसभा मतदारसंघामध्ये एकूण मतदार १८ लक्ष ५१ हजार ८४३ यापैकी ११ लक्ष २८ हजार ५७० मतदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुष मतदार ६ लक्ष ६ हजार ४८८, स्त्री मतदार ५ लक्ष २२ हजार ६२ व तृतीयपंथीयांची संख्या २० आहे. एकूण टक्केवारी ६०.९४ अशी आहे.

### ३० व्हीव्हीपॅट बदलले

लोकसभेच्या मतदान प्रक्रियेमध्ये सर्वात महत्त्वाचे असणारे मतयंत्र अर्थात व्हीव्हीपॅट, बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट. जिल्ह्यामध्ये मतदान प्रक्रिया दरम्यान ४ हजार १३६ बॅलेट युनिट वापरल्या गेले. त्यापैकी प्रक्रियेदरम्यान २० बॅलेट युनिट बदलले गेले. २ हजार ६८ कंट्रोल युनिट वापरले गेले. त्यापैकी दहा कंट्रोल युनिट बदलले गेले. तर २ हजार ६८ व्हीव्हीपॅट पैकी ३० व्हीव्हीपॅट प्रक्रिया दरम्यान बदलले गेले. निवडणूक आयोगाने भेल कंपनीच्या १२ अभियंत्यांची जिल्ह्यात नियुक्ती केली होती. ज्या ठिकाणी प्रक्रिया दरम्यान यंत्र बिघडले त्या ठिकाणी ते बदलण्यात आले. मात्र यामुळे मतदान प्रक्रियेवर कोणताही बदल झाल्याची घटना नाही.

### दोन गुन्ह्यांची नोंद

जिल्ह्यामध्ये देगलूर विधानसभा मतदारसंघामध्ये दोन गुन्ह्यांची नोंद झाली आहे. यामध्ये एक गुन्हा रामतीर्थ पोलीस स्टेशन अंतर्गत नोंदविण्यात आला आहे. व्हीव्हीपॅट व बॅलेट युनिटची तोडफोड करणाऱ्या या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंट्रोल युनिटला काही डॅमेज झाले नाही. त्यामुळे मतदान प्रक्रियेवर कोणताही फरक पडला नाही. पोलिसांनी गुन्हेगाराला ताब्यात घेतले आहे. दुसरा गुन्हा देखील याच विधानसभा क्षेत्रात झाला आहे. देगलूर येथे विनापरवाना मोबाईलने शूटिंग करणाऱ्या एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोपनीयतेचा भंग केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल केलेला आहे.



### जिल्हाधिकाऱ्यांनी मानले आभार

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये मतदान करणाऱ्या सर्व मतदारांचे आभार मानले आहेत. ज्यांना या निवडणुकीत काही कारणास्तव मतदान करता आले नाही त्यांनी तातडीने आपल्या नावाची नोंद करावी. नोंदीची खातरजमा करावी, असे आवाहन केले आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत सर्वांना सुलभपणे मतदान करता येईल यासाठी नोंदणी प्रक्रियेत लक्षपूर्वक सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. याशिवाय गेल्या ७५ दिवसांपासून अखंडपणे काम करणाऱ्या आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून सर्व सहकाऱ्यांचे त्यांनी आभार मानले आहेत. निवडणूक यंत्रणेत काम करणाऱ्या विशेषत: शिक्षकांचे त्यांनी विशेष आभार मानले असून प्रशिक्षणापासून प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत सक्रियेतेने सहभागी झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. विविध संघटना, संस्था, विद्यार्थी, मान्यवरांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नासाठी विशेष ऋणनिर्देश केले आहे. याशिवाय सर्व बिएलओ, क्षेत्रिय अधिकारी, पोलीस व अन्य सुरक्षा दलाचे अधिकारी-कर्मचारी, वीज मंडळाचे कर्मचारी, प्रसार माध्यमातील सर्व सहकारी तसेच ग्रामपातळीवर काम करणारे ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यासह सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचारी, अंगणवाडी सेविका यांचेही आभार व्यक्त केले आहे.